# प्रकरण दुसरे

## नियंत्रित बाजारपेठ, अभ्यासाची रूपरेषा आणि पंढरपूर तालुक्याची व सर्वेक्षण क्षेत्राची अर्थव्यवस्था

२.१ नियंत्रित बाजारपेठ

२.२ अभ्यासाची रूपरेषा

२.३ पंढरपूर तालुक्याची अर्थव्यवस्था

२.४ अभ्यासाखालील खेडेगावांची पार्श्वभूमी

# प्रकरण दुसरे

## नियंत्रित बाजारपेठ, अभ्यासाची रूपरेषा आणि पंढरपूर तालुक्याची व सर्वेक्षण खेड्यांची अर्थव्यवस्था

### २.१ नियंत्रित बाजारपेठ :

शेतकरी [विक्रेते] व ग्राहक [व्यापारी] या दोन्ही पक्षांनी समानतेच्या स्तरावरून व बरोबरीच्या नात्याने आपल्या मालाच्या विक्री व खरेदीसंबंधीचे व्यवहार करावेत. तसेच कृषकांना संरक्षण देण्यासाठी व कृषि व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी नियंत्रित व सुसंघटीत बाजारपेठ असणे आवश्यक झाले होते.

### २.१.१ नियंत्रित बाजारपेठांची व्याख्या :

१] MAMORIA & JOSHI :

"When the state or any public authority comes forward to enforce regulation for the organisation of a market, it is termed as regulated market".

मेमोरिया व जोशी यांच्या मते नियंत्रित बाजारपेठ सार्वजनिक अधिकारातून किंवा शासनामार्फत बाजार संघटनेवर नियंत्रण केले जाते तेव्हा निर्माण होते.

२] K.N. PATHAK :

"A regulated market is one, proceedings and practices of which are formally regulated by some suitable legislation".

नियंत्रित बाजारपेठांचे व्यवहार व कामकाज योग्य कायद्यानी नियंत्रित केलेले असतात असे के.एन.पाठक यांनी मत व्यक्त केले आहे.

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

३] "नियंत्रित बाजारपेठ म्हणजे अशी बाजारपेठ की, जी राज्य सरकारच्या विशिष्ट कायद्यानुसार स्थापन होते आणि त्या कायद्यानुसारच कार्य करते."

ग्रामपंचायत, नगरपरिषद व जिल्हापरिषद इत्यादी संस्था आपल्या कार्यक्षेत्रात भरणा-या बाजारपेठांचे वा बाजाराचे नियमन आणि नियंत्रण करण्याकरिता आपले काही पूरक नियम तयार करतात. राज्य सरकारचे प्रमुख नियम व या संस्थांचे पूरक नियम यानुसार ही बाजारपेठ नियंत्रित केली जाते.

## २.१.२ <u>पार्श्वभूमी</u>

सर्वप्रथम १८९७ मध्ये बेरार कापूस व धान्य मंडी अधिनियम मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार कापसासाठी नियंत्रित बाजारपेठ निर्माण करण्यात आली. १९२६-२८ पर्यंत याशिवाय विशेष अशी प्रगती झाली नाही. शाही कृषि आयोगाने नियंत्रित बाजारपेठांचे संघटन करणे कृषकाच्या हितासाठी अत्यंत आवश्यक आहे अशी शिफारस केली. मंडी कापसापुरतीच मर्यादित न ठेवता इतर कृषिमालासाठी देखील असावी. राज्य सरकारने यादृष्टीने सक्रिय प्रयत्न करावेत असेही आयोगाने सुचविले. या आयोगाच्या शिफारशीनुसार अनेक राज्यात "नियंत्रित मंडी" कायदे मंजूर करण्यात आले. मध्यप्रदेश-१९३२, मद्रास-१९३३, हैद्राबाद-१९३९, मुंबई-१९३९ आदी. योजनाकाळात "नियंत्रित विपणनाच्या" संघटनावर जोर दिला गेला त्यामुळे या काळात यादृष्टीने बरीच प्रगती झाली. सध्याच्या स्थितीत जम्मु व काश्मिर राज्यामध्ये एकही नियंत्रित बाजारपेठ नाही. इतर सर्व राज्यात त्यांची स्थापना झाली आहे. १९८४-८५ पर्यंत पंजाब [६७९], महाराष्ट्र [६७५], मध्यप्रदेश [६३३], उत्तरप्रदेश [६२३], आंध्रप्रदेश [५५६] या राज्यातून बहुसंख्य नियंत्रित बाजारपेठा आहेत.

२.१.३ <u>नियंत्रित बाजारपेठेची वैशिष्ट्ये</u>

१) मंडीचे संचालन व व्यवस्थापन क्रेते व विक्रेते यांच्यामधून निवडून आलेल्या प्रतिनिधीमार्फत लोकशाही पध्दतीने चालते.

२) बाजाराच्या कार्याचे निरीक्षण करणे, कोणतीही बेकायदेशीर व फसवेगिरीची कृत्ये होणार नाहीत याची दक्षता घेणे, वजन, मापे, काटे यांचे निरीक्षण करणे ही कार्ये समितीकडे असतात.

३) दलाल, मालाचे वजन करणारे व्यापारी व अन्य मध्यस्थ यांना पंजीयन आवश्यक असते.

४) क्रेता व विक्रेता यांच्यात निर्माण होणारा वाद समितीमार्फत निकालात काढला जातो.

५) प्रमाणित वजनांचा वापर करण्यात येतो. वेळोवेळी वजन-मापे निरीक्षकांकडून तपासून घ्यावी लागतात.

६) मालाची विक्री खुल्या लिलावात करतात. त्यात कोणत्याही प्रकारचा गुप्तव्यवहार नसतो.

७) मंडीत, आवारात व कार्यालयात कृषकांना विपणीविषयक माहिती मिळण्याची व्यवस्था असते.

८) मंडी व बाजार समितीवर सरकारचे नियंत्रण असते.

अन्नधान्य व इतर कृषिमालाची विक्री देखील नियंत्रित मंडीत होते. मंडीच्या नियंत्रणाची जबाबदारी उत्पादक, विक्रेते, खरीददार व अडते यांच्यावर असते. समितीवर अधिकांश कृषकांचे प्रतिनिधी असतात.

## २.१.४ मुंबई कृषि उत्पन्न खरेदी विक्री [नियमन] अधिनियम १९३९

१९३८ मध्ये केंद्रीय कृषि विपणन विभागाने [सध्याचे विपणन व अवेक्षणाचे संचालक कार्यालय] कृषि वस्तुंच्या नियमनासाठी कायद्याचा मसुदा तयार केला. यानुसार महाराष्ट्रात कायद्याचा आराखडा तयार केला गेला आणि १९३९ मध्ये "मुंबई कृषि उत्पन्न खरेदी-विक्री [नियमन] अधिनियम" मंजूर करण्यात आला. कृषि विपणन कायद्याच्या इतिहासामध्ये प्रथमच या कायद्यानुसार सर्व कृषि उत्पादनाचा, बागायती उत्पादने व पशुधनाचा समावेश केला गेला. या कायद्याचा सामान्य उद्देश शेतकरी उत्पादकाच्या वस्तूंना शक्यतितकी चांगली किंमत मिळवून देणे हा होता.

बाजार व बाजार समितीची प्राथमिक घटना, बाजार समितीचे एकीकरण, त्यांचे अधिकार व कामे, व्यापार भत्ते व इतर तरतुदींचा मुंबई कायदा, १९३९ चे मुख्य मुद्दे होत.

## २.१.५ महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री [नियमन] अधिनियम १९६३

महाराष्ट्र राज्याची मे १९६० मध्ये स्थापना झाल्यामुळे विविध जिल्ह्यातून विविध विपणन कायद्यांची अंमलबजावणी रद्द करून संपूर्ण राज्यात एकच कायदा असावा अशी सुधारणा करणे आवश्यक झाले होते. मुंबई [१९३९], विदर्भ [१९३५], हैद्राबाद [१९३९] असे नियंत्रित विपणन कायदे होते. तिन्ही प्रदेश महाराष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्राखाली आल्यामुळे १९५५ मध्ये एक समिती नेमून कृषि उत्पन्न बाजार नियमनाच्या पध्दतींचा संपूर्ण अभ्यास करण्यात आला. या समितीने मुंबई कृषि उत्पन्न बाजार कायदा १९३९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बऱ्याच सूचना केल्या. त्यानुसार महाराष्ट्र कायदा १९३६ या मसुदा तयार केला गेला.

"महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री [नियमन] अधिनियम १९६३" हा विस्तृत स्वरूपातील कायदा राज्यसभेत १२.१२.१९६३ मध्ये संमत करण्यात आला.

ह्या परीवर्तीत केलेल्या कायद्याने नमुद केलेल्या अटी १५ जुन १९६७ पासून आमलात आणल्या गेल्या. या कायद्यात १९६८ व १९७० मध्ये सुधारणा केल्या गेल्या.

२.१.६ नियंत्रित बाजार कायद्याच्या ठळक बाबी

१] बाजार कायद्याचा उद्देश

कायद्यामुळे शेतकरी उत्पादकास विविध प्रकारचे लाभ व सोई-सुविधा मिळत असल्यामुळे कृषकांसाठी कायद्याची आवश्यकता आहे. विपणन कायद्याचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१] शेतक-यांची सौदाशक्ती वाढविणे
२] विपणन पध्दतीत खुल्या लिलावाचा अवलंब करणे
३] कृषि वस्तू विक्रीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे
४] कलहामध्ये समझोता घडवून आणणारी संघटना निर्माण करणे व
५] स्पर्धात्मक खरेदीपध्दती अवलंबणे.

शेतक-यांना मध्यस्थांच्या त्रासापासून मुक्त करुन त्यांना योग्य न्याय देणे हा कायद्याचा मुख्य हेतू आहे.

२] कार्यक्षेत्र

बाजार समिती ज्या भागासाठी स्थापन झाली असेल ते किंवा तालुक्याची संपूर्ण महसुली मर्यादा हे "बाजार क्षेत्र" होय. मुख्य बाजार आवारा-पासून दहा किलो मीटर्स अंतरावरील क्षेत्रास "मुख्य बाजार" असे म्हणतात. जेथे विपणन कार्य पार पाडले जाते अशा मुख्य व उप बाजार आवारास "बाजार आवार" म्हणतात.

३] बाजार समितीची रचना

महाराष्ट्र कायद्यातील १९६८ च्या सुधारणेनुसार बाजार समितीत एकूण १८ सदस्य असतात. यामध्ये शेतकरी प्रतिनिधी दहा [प्राथमिक सह.पत संस्था-सात, + ग्रामपंचायत-तीन] व्यापारी प्रतिनिधी-तीन, तालुका खरेदी-विक्री

संघ सभापती, पंचायत समिती सभापती, नगरपरिषद प्रतिनिधी, जिल्हा परिषद प्रतिनिधी आणि जिल्हा कृषि अधिकारी असे प्रत्येकी एक सदस्य बाजार समितीत असतात.

४) कार्यालयीन अधिकार-यांचा कालावधी

शासन नियुक्त बाजार समितीचा कालावधी दोन वर्षे आणि लोकनियुक्त बाजार समितीचा कालावधी तीन वर्षे असतो. बाजार समिती सरकारी राजपत्रामध्ये प्रसिध्द केली जाते. महाराष्ट्र कायदा १९७१ नुसार निवडणूक निकाल झाल्यानंतर त्वरीत समिती मधील सदस्यांची नावे प्रसिध्द केली जातात.

५) सभापती व उपसभापती

बाजार समितीच्या संचालक मंडळाकडून सभापती व उपसभापतीची नेमणूक केली जाते. दोन्ही पदासाठी विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची गरज नसते. त्यांना दरमहा २,६००/- रुपये मानधन निश्चित केले जाते. उभयतांच्या पदाचा कालावधी सामान्यपणे तीन वर्षे असतो.

६) स भा

दोन महिन्यात किमान एक सभा होते. १९७१ च्या सुधारणेनुसार विशिष्ट कालावधीनंतर सभा घेणे, सभेस किमान १० सदस्यांची उपस्थिती अशी बंधने घातली आहेत.

७) उप-समिती

कायद्यातील तरतुदीनुसार विविध उप-समित्या स्थापण्या जातात. जसे सेवक भरती व पदोन्नतीसाठी सेवक समिती, बांधकाम समिती, किंमत, वजन इ. व्यवहारातून उद्भवणा-या वादांसाठी "वादा समिती" नेमली जाते. पंच मंडळी-व्दारा कलह त्वरीत मिटविला जातो. उप-समितीचा सभापती हा बाजार समितीचा उपसभापती असतो.

८] बाजार समितीचे अधिकार व कार्ये

बाजार समितीला खालील कार्ये करावी लागतात.

१] कायद्यातील तरतूदी, नियम व उपविधींची अंमलबजावणी करणे.

२] व्यापार करण्याच्या हेतूसाठी बाजारात प्रवेश करणा-यांच्या वर्तनावर पर्यवेक्षण करणे.

३] सर्व व्यक्ती व वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे.

४] अनुज्ञप्ती देणे, नुतनीकरण करणे, स्वाधीन नाकारणे, व परवाना काढून घेणे.

५] कायदा, नियम व उपविधीतील तरतूदींचा भंग करणा-यावर खटला भरणे.

६] कृषि उत्पन्न बाजारासंबंधी विविध प्रकारचे उद्भवणारे कलह मिटविणे.

७] कृषि विपणन संचालक मंडळाच्या मागणीनुसार कृषि उत्पादनाची विक्री, साठवणूक, प्रक्रीया, किंमती याबाबतच्या हालचालींच्या माहितीचे एकत्रीकरण करून ती माहिती प्रसिध्द करणे.

८] बाजाराचे व्यवस्थापन व्यवस्थित राखणे.

९] बाजार आवारात कृषि उत्पन्नाचे विपणन, वजन व विक्री व्यवस्थेबाबत नियंत्रण करणे.

१०] विपणन कार्याची कार्यक्षमता वाढविण्याच्या हेतूसाठी आवश्यक असणारी साधने, चल व अचल संपत्ती, खरेदी करून त्या रास्त वापरासाठी उपयोगात आणणे.

११] कायद्याप्रमाणे प्रतवारी व प्रमाणिकरणास प्रोत्साहन देऊन भेसळी विरूध्द पाऊल उचलणे.

१२] कायदा, नियम व उपविधीतील तरतुदी अंमलात आणणे व कायद्यानुसार परवाना देणे.

१३] अशाप्रकारे ठरवल्याप्रमाणे अधिकारांचा वापर करणे.

९] प्रशासकीय सेवक

बाजार व्यवस्थापन पाहण्यासाठी बाजार समिती सचिव, इतर अधिकारी व कर्मचा-यांची नेमणूक करते. सेवक वर्गात सचिव, सहाय्यक सचिव,

लेखापाल, पर्यवेक्षक, परवाना तपासनीस, कनिष्ठ लिपीक, सहाय्यक संख्या-शास्त्रज्ञ, रखवालदार, शिपाई, मुख्य शिपाई, मुख्य रखवालदार, ग्रेडर यांचा समावेश होतो. ज्या बाजार समितीचे उत्पन्न १ लाख रुपयांच्यावर असते व उत्पन्नाच्या तुलनेत अस्थापना खर्च ४५ टक्क्यापर्यंत असतो अशी समिती "अ" वर्गातील असते. यामध्ये १९ सेवक असतात. "ब" वर्गातील बाजार समितीमध्ये [५०,००० ते १ लाख रुपये उत्पन्न व अस्थापना खर्च उत्पन्नाच्या ५० टक्के ] कर्मचारी संख्या १५ असते. "क" वर्गातील बाजार समितीमध्ये [३०,००० ते ५०,००० रुपये उत्पन्न व अस्थापना खर्च उत्पन्नाच्या ५५ टक्के] कर्मचारी संख्या ९ असते. "ड" वर्गातील बाजार समितीमध्ये [२०,००० ते ३०,००० रुपये उत्पन्न व अस्थापना खर्च उत्पन्नाच्या ६० टक्के] कर्मचारी संख्या ४ असते. "ई" वर्गातील बाजार समितीमध्ये देखील [१०,००० ते २०,००० रुपये उत्पन्न व अस्थापना खर्च उत्पन्नाच्या ६५ टक्के] कर्मचारी संख्या चार असते. "फ" वर्गातील बाजार समिती मध्ये [१०,००० रुपयापेक्षा कमी उत्पन्न व अस्थापना खर्च उत्पन्नाच्या ७० टक्के] कर्मचारी संख्या फक्त तीन असते.

सचिव हा बाजार समितीने ठरविलेल्या गोष्टींची अंमलबजावणी करणारा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. सभापतीने काही अधिकाराचे उत्तरदायीत्व सचिवाकडे सोपविलेले असते. सचिव कर्मचाऱ्यांना कामे वाटून देतो. बाजार समितीच्या सभेस तो उपस्थित राहू शकतो. बाजार आवार, खाते पुस्तके, कजने व मापे यांच्यावर पर्यवेक्षण करतो. आवारात उद्भवणारे तंटे तासडतोब मिटवितो. बाजार समितीचे यश बहुतेक करून सचिवाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.

बाजार समितीच्या स्थापनेबरोबर प्रत्येक मोठ्या उप बाजार आवारात सह-सचिव, एक लिपीक, एक शिपाई तर प्रत्येक लहान उप बाजार आवारामध्ये एक लिपीक, व एक शिपाई नेमण्यास कायद्याने परवानगी आहे.

"अ" व "ब" वर्गातील बाजार आवारासाठी मुख्य शिपाई, मुख्य रखवालदार, ग्रेडर ची जास्तीची नेमणूक असते. कायद्याप्रमाणे प्रत्येक बाजार समिती आपल्या कर्मचा-यांची नेमणूक करते.

१०] <u>शिक्षण व प्रशिक्षण</u>

भरती नियमानुसार अधिकारी पदवीधर असावा लागतो व वरिष्ठ कर्मचारी एस.एस.सी. पर्यंत शिक्षित असतो. कनिष्ठ कर्मचा-यांसाठी शैक्षणिक अर्हता नाही. बाजार समिती कर्मचा-यांना प्रशिक्षणासाठी पाठवितात. प्रशिक्षित कर्मचा-यांना किमान तीन वर्ष सेवा करणे आवश्यक असते.

११] <u>भविष्य निर्वाह निधी</u>

बाजार समिती स्वत:च्या उपविधीत भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, अपघात नुकसान भरपाई याबाबत तरतूद करते.

१२] <u>नियंत्रणाख्यालील वस्तु</u>

कायद्यातील सुधारणेनुसार [१९७२] ११० वस्तुंचे नियंत्रण केले जाते. यामध्ये १५ अन्नधान्ये, १३ द्विदल धान्ये, १२ तेलबिया, १७ फळे, १० जनावरे इ. चे नियमन केले गेले.

१३] <u>बाजार आवाराचा आकार</u>

एका तालुक्यासाठी वा गरज असल्यास एकापेक्षा जास्त तालुक्यासाठी मुख्य बाजार आवार व उपबाजार आवाराची स्थापना होते. बाजार समितीसाठी शासन योग्य जागा मिळवून देते. आवारात इमारती उभारणे व सोई-सुविधा निर्माण करणे ही बाजार समितीची जबाबदारी असते. दुकाने व गोदाम बांधणीसाठी परवानाधारकांमध्ये प्लॉटची वाटणी केली जाते. बाजार क्षेत्राचे प्रमाणाबाबत इंडियन स्टॅन्डर्डस् इन्स्टीट्यूट [नवी दिल्ली] ने विहित नमुना सांगितला आहे. "अ" वर्ग बाजार समितीसाठी २४.३ हेक्टर, "ब" वर्ग बाजार

8274

समितीसाठी २०.३ हेक्टर, "क" वर्ग बाजार समितीसाठी १०.१ हेक्टर व "ड" वर्ग बाजार समिती साठी ५ हेक्टर अशा आकारामध्ये बाजार आवार असावे.

१४) <u>बाजार समितीची वित्तीय स्थिती</u>

अनुज्ञप्ती फी व बाजार फी हे दोन मुख्य उत्पन्नाचे स्तोत्र आहेत तसेच बाजार समितींना राज्य शासनामार्फत अनुदान व कर्ज मिळते. बाजारातील मध्यस्थांकडून मिळणारे दंड यातच समाविष्ट होतात.

अ) <u>अनुज्ञप्ती फी-</u>

समितीच्या पोट कायद्यातील दराप्रमाणे बाजार समिती बाजार मध्यस्थांकडून अनुज्ञप्ती फी वसूल करु शकते. कायदा भंग करणाऱ्यांचा बाजार समिती काही कालावधीसाठी परवाना रद्द करु शकते.

ब) <u>बाजार फी -</u>

बाजार समितीला कृषि उत्पन्नातील व्यवहारावर लेव्ही फी आकारण्याचा अधिकार आहे. शेतमालाच्या वजनाच्या प्रमाणात विक्रेत्याकडून बाजार फी वसूल केली जाते. तसेच शेतमालाच्या किंमतीनुसार बाजार फी खरेदीदाराकडून वसूल केली जाते. प्रत्येक १०० रुपया मागे शेतमालावर किमान १५ पैसे ते कमाल ३० पैसे पर्यंत बाजार फी आकारली जाते. कोंबड्यांच्या संख्येनुसार प्रत्येकी किमान ५ पैसे ते कमाल १० पैसे, शेळ्या-मेंढयांबाबत प्रत्येकी किमान २५ पैसे ते कमाल ५० पैसे,जनावरांच्या १०० रु.च्या विक्रीवर किमान ५० पैसे व कमाल १ रुपया अशात-हेने बाजार फी वसूल केली जाते.

क) <u>देखरेख फी</u>

महाराष्ट्र कायदा सुधारणा १९७२ नुसार प्रत्येक खरेदीदाराकडून प्रत्येक १०० रुपये विक्रीवर ५ पैसे देखरेख खर्च म्हणून वसूल केला जातो.

ड) बाह्य मार्ग :

जमीन खरेदी व बांधकाम करण्याकरीता आणि सोई-सुविधा निर्माण करण्यासाठी बाजार समिती कर्ज मिळविते. तांत्रिक व आर्थिक घटक लक्षात घेऊन राज्य शासन ५.५ टक्के दराने कर्ज मजूंर करते. आणि त्याची परतफेड १५ वार्षिक हप्त्यात केली जाते. बाजार समितीचा कायम निधीची निर्मिती करुन कर्ज व व्याज चुकते केले जाते. शासन बाजार समितीच्या प्रारंभी व ज्या बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न १०,००० पेक्षा कमी असेल अशा बाजार समितीस ३,००० रुपये अनुदान देते. जर वार्षिक उत्पन्न १०,००० रुपया पेक्षा जास्त असेल तर ५,००० अनुदान रुपये दिले जाते.

प्रत्येक बाजार समिती महाराष्ट्र कायदा व सुधारणेच्या पातळी बरोबर पोट कायदा तयार करते व त्यानुसार कार्यपध्दती पार पाडली जाते.

२.२ अभ्यासाची रुपरेषा :

नैसर्गिक घटक, (पाऊस) प्रमाण, भौतिक, वित्तीय व तांत्रिक सेवा व सुविधांची स्थिती यामुळे शेतमालाच्या किंमत पातळीत सातत्याने चढ-उतार येत असत. आधुनिक पध्दतीने ही समस्या काही अंशी सुटली आहे. अधिक उपज देणारे बियाणे ( HYV ) आणि नवीन तंत्र यामुळे"बाजार अधिक्य" प्रमाण वाढले आहे. मात्र बाजारपेठेतील व्यापाऱ्यांच्या दुराचामुळे शेतकऱ्यास नुकसान पत्कराचे लागते. यासाठी शासनाने नियंत्रित बाजारपेठांची निर्मिती केली. यामुळे शेतकरी प्रोत्साहित होऊन कृषि बाजार सदृढ बनला. दोन दशकापूर्वीपासून हा केंद्र व राज्य शासनाचा हस्तक्षेप सर्व राज्यातून दिसून येतो.

महाराष्ट्र राज्याने नियंत्रित बाजारपेठांसाठी दोन कायदे केले. दि बाँबे अँग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट अँक्ट १९३९ व दि महाराष्ट्र अँग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट अँक्ट १९६३ आणि त्याचे उपनियम केले आहेत.

यानुसार प्रत्येक तालुक्यात किमान एक नियंत्रित बाजार पेठ स्थापन केली गेली. अशा नियंत्रित बाजारांना "बाजार समिती" संबोधले जाते. नियंत्रित बाजार पेठातून कायद्याचा अमंल कशाप्रकारे होतो हे अभ्यासणे आवश्यक ठरते. नियंत्रित बाजारपेठांची कार्यप्रणाली आणि उद्दिष्टपूर्ती पाहण्यासाठी अभ्यासाचा हा अट्टाहास.

प्रस्तुत अभ्यासाचे नांव "कृषि उत्पन्न बाजार, पंढरपूरचा अभ्यास" असा आहे.

२.२.१ प्रस्तुत अभ्यासाचे उद्देश

१] कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर स्थापनेमुळे शेतक-यांना शेतमाल विक्रीबाबत लाभ मिळाले याचा अभ्यास करणे.
२] पंढरपूर तालुक्यातील शेतक-यांची आर्थिक व सामाजिक स्थिती तपासणे.
३] शेतक-याचे शेतमालाच्या उत्पादन व विक्री संदर्भात वर्तन तपासणे.
४] शेतमाल विक्री व्यवस्थेत मध्यस्थांचे वर्तन तपासणे.
५] कृषि उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमुळे पीक पध्दतीतील बदल व उत्पन्नात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
६] नियंत्रित बाजारपेठ म्हणून कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर मधील कार्यपध्दती तपासणे.
७] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास अभ्यासणे.
८] बाजारसमितीचे प्रशासन तपासणे.
९] बाजार आवारामधील सोई-सुविधांचा अभ्यास करणे.
१०] बाजारामधील विक्री पध्दतीचा अभ्यास करणे.
११] कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरच्या विकासासाठी सूचना करणे.

२.२.२ अभ्यास पध्दती [व्याप्ती व मर्यादा]

१] अभ्यासासाठी प्रदेशाची निवड

सोलापूर जिल्ह्यातील एकूण दहा बाजार समित्यांपैकी पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती ही एक आहे. या मुख्य बाजार आवारावर अभ्यासाचा प्रकाशझोत आहे. याच्या उप-बाजारांचा अभ्यास सखोल केला नाही. संपूर्ण पंढरपूर तालुका कृषि उत्पन्न बाजाराखाली येत असल्यामुळे आणि संशोधक नजीकच्या [मंगळवेढा] तालुक्यातील दिर्घकाळचा रहिवाशी असल्या कारणाने तसेच सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तहशिल महत्वाचा आहे. त्यामुळे या बाजार-समितीची अभ्यासासाठी निवड केली आहे. येथील कृषि विकास झपाटयाने झालेला आहे. त्यामुळे नियंत्रित बाजारपेठ हेतुपुरस्सर निवडली आहे.

२] कृषि वस्तुंची निवड

सोलापूर जिल्ह्यात राज्य शासनाच्या धोरणानुसार पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापली गेली. ती एक सुपरीचीत बाजारपेठ आहे. त्यामुळे विविध कृषि वस्तुंच्या विपणनाचे नियमन केले गेले. या नियमित वस्तुंची आवक दिवसेंदिवस वाढत आहे. पंढरपूर बाजार समितीमध्ये एकूण ३४ नियमित वस्तू आहेत. त्यापैकी १९७८-७९ मध्ये ज्या वस्तुंची आवक १० टक्क्यापेक्षा जास्त आहे अशा ७ सात वस्तुंचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात केला आहे.

३] तथ्य संकलन

१] कागदपत्रे -

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल, त्यांची इतर कागदपत्रे, तपासणी अहवाल, पंचायत समितीची कागदपत्रे, शासकीय प्रकाशने, संबंधीत अभ्यास पुस्तके, ग्रंथ आणि इतर मासिके व साप्ताहिके यांचा माहिती संकलनासाठी वापर केला.

२] प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे प्राथमिक तथ्य संकलनावर आधारीत आहे. मुख्य बाजार आवारात भेटी देऊन अभ्यासाखालील नियंत्रित बाजार-पेठेची प्रत्यक्ष कार्यपध्दती यांचे वैयक्तिकरीत्या निरक्षण व परीक्षण केले. बाजार समितीचे सभापती, उपसभापती, सचिव, प्रशासकीय कर्मचारी, व्यापारी, शेतकरी व ग्राहकांच्या खुल्या मौखिक मुलाखती आणि गरजेनुसार चर्चा केली. मुख्यत्वे पंढरपूर तालुक्यातील ८० उत्तरदात्या शेतक-यांच्या संरचित मुलाखती घेतल्या.

उत्तरदात्या कृषकांची निवड -

पंढरपूर तालुक्यातून बाहेर जाणा-या विविध रस्त्यावरील पंढरपूर शहराच्या नजीकची चार खेडी [गादेगाव, तुंगत, रोपळे व भंडीशेगाव] आणि पंढरपूर शहरापासून लांबची चार खेडी [करकंब, सरकोली, माळवणी व सिध्देवाडी] अशी आठ खेडी पंढरपूर शहराच्या सर्व बाजूनी निवडली. अशा आठ खेडयातून प्रत्येकी दहा शेतक-यांची निवड केली. सर्व शेतकरी कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरशी संबंध असलेले आहेत.

अशाप्रकारे पंढरपूर तालुक्यातील या आठ खेड्यातील ८० शेतक-यांना प्रश्न विचारुन स्वत: प्रश्नावली भरली. यामधील बहुतेक प्रश्न बंदिस्त स्वरुपाचे आहेत. प्रश्नाबाबत खुलासा करुन जास्तीत-जास्त माहिती घेऊन रास्त उत्तर नमूद करण्याचा प्रयत्न केला.

अशाप्रकारे तथ्य संकलन करुन तक्ते, आराखडे, नकाशे व आलेखाच्या माध्यमातून साध्या सांखिकिय पध्दतीच्या आधारे पृथक्करण केले.

२.२.३ गृहितक

"कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर [जि. सोलापूर] च्या स्थापनेमुळे कृषकांना लाभ झाला."

२.२.४ अभ्यास योजना

ह्या अभ्यासातील विविध माहिती खालीलप्रमाणे प्रकरणात मांडली आहे.

प्रकरण पहिले :-

पहिल्या प्रकरणामध्ये कृषि विपणनाची संकल्पना, क्रियाशील विपणन पध्दतीचे उद्देश, कृषि विपणनाचे महत्व भारतातील कृषि विपणन [बाजारपेठांचे वर्गीकरण, कृषि व्यापार पध्दती, कृषि उत्पादनाचे विपणन मार्ग], भारतातील कृषि विपणनाच्या समस्या आणि याबाबत शासनाचा हस्तक्षेप याबाबींचा अभ्यास केला आहे.

प्रकरण दुसरे :-

दुसऱ्या प्रकरणामध्ये नियंत्रित बाजारपेठेची संकल्पना, वैशिष्टये व फायदे वर्णिले आहेत. तसेच महाराष्ट्रातील विपणन कायदा व त्यातील ठळक बाबींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. यानंतर प्रस्तुत अभ्यासाची रुपरेषा दिली आहे. पुढे पंढरपूर व सर्वेक्षणातील आठ खेड्यांची थोडक्यात ओळख दिली आहे.

प्रकरण तिसरे :-

सदर प्रकरणामध्ये पंढरपूर f कृषि उत्पन्न बाजार समितीची कार्यप्रणाली अभ्यासली आहे. यामध्ये स्थापना, कार्यक्षेत्र उप-बाजार, बाजार आवार रचना, प्रशासन, बाजार समितीची रचना, सभापती व उपसभापती, सभा, उपसमित्या, बाजार व्यवस्थापन या प्रशासकीय बाबींची चर्चा केल्यानंतर बाजार आवाराचा विकास, आवारातील सोई-सुविधा, नियमित केलेल्या कृषि वस्तु, बाजार समितीचे परवानाधारक, विपणन आकार [परवाना फी, बाजार फी] यांचा अभ्यास केला आहे. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचा व्यवसाय कसा चालतो याबाबत नियमित केलेल्या ३४ वस्तूंपैकी १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकात एकूण आवक, एकूण मूल्य आणि सर्वसाधारण किंमतीबाबत १९७८-७९ मध्ये

ज्या वस्तूंची आवक १० टक्क्यापेक्षा जास्त आहे अशा शेंग, ज्वारी, गुळ, कापूस, कांदा या पाच शेतमालांचा व बैल शेळ्या-मेंढया या दोन पशुधन प्रकारांचा सखोल अभ्यास या संदर्भात केला. तसेच सहकारी संस्थांचा पंढरपूर बाजारपेठेतील सहभाग, शेतमालाची प्रतवारी, कृषि उत्पादनाचे वितरण, बाजार माहिती, शेतमाल विक्री व्यवस्था, या विविध घटकांचा अभ्यास केला. अखेरीस पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची वित्तीय स्थिती (उत्पन्न, खर्च कायम निधी, कर्जे व अनुदान) बाबत उहापोह केला आहे.

## प्रकरण चौथे :-

या प्रकरणामध्ये सर्वेक्षण गावातील शेतक-यांची सामाजिक व आर्थिक स्थिती तपासली आहे. यामध्ये कृषकाचे वय, जात, शिक्षण, व्यवसाय, अनुभव व काळ, कुटूंब आकार, वार्षिक उत्पन्नातील बदल, धारणा क्षेत्र, पीक प्रकार, जमीन व्यवहार, कर्ज पुरवठ्याचे मार्ग, आणि बाजार आवार पंढरपूर स्थापण्या मागील उद्देश याबाबत कृषकांची प्राथमिक स्वरुपाची ओळख दिली आहे.

## प्रकरण पाचवे :-

पाचव्या प्रकरणामध्ये कृषकाचे शेतमालाच्या उत्पादन व विक्री संदर्भा- तील वर्तन तपासले आहे. वाहतूक साधने, साठवणूक, बाजार माहिती, वजनमापन, प्रतवारी, प्रामुख्याने कृषक शेतमाल कोणाकडे विक्री करतो, त्यांच्या शेतमालास रास्त किंमत मिळते का, कृषि बाजार पेठेपासून शेतक-यांना प्राधान्यतेने मिळणारे लाभ या बाबींचा उहापोह शेतक-यांची मते घेऊन केला आहे.

## प्रकरण सहावे :-

शेतमाल विक्री होईपर्यंत मध्यस्थाचे वर्तन शेतक-यांच्यादृष्टीने कसे असते याचे विश्लेषण सदर प्रकरणात केले आहे. तत्पूर्वी शेतकरी पिकवीत असलेली पीके व पूर्वी घेत असलेली पीके याचे विवेचन झाल्यानंतर शेतक-यास बाजारात जाण्यास

येणारे अडथळे, शेतमालाची स्थानिक खरेदी, कमिशन एजंटची गरज, व्यापारातील मध्यस्थांचा दुराचार, दुराचार दूर करण्यासाठी सूचना, बाजार फी ची निश्चितता, बाजारातील सततची बजावट, शेतमाल विक्रीसाठी लागणारा कालावधी, शेतमालाची प्रत्यक्ष विक्री याबाबत शेतक-यांची प्रवृत्ती, पंढरपूर बाजाराबाबत शेतक-यांनी प्राधान्यतेने सांगितलेल्या अडचणी, आणि अखेरीस शेतक-यांनी पंढरपूर बाजार आचाराबाबत केलेल्या सूचनांचा अंतर्भाव केला आहे.

प्रकरण सातवे :-

निष्कर्ष आणि सूचना

२.३ पंढरपूर तालुक्याची अर्थव्यवस्था :

महाराष्ट्र राज्यातील तीस जिल्ह्यापैकी सोलापूर जिल्हा पुणे प्रशासकीय विभागात येतो. सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यापैकी पंढरपूर तालुका हा एक आहे. पंढरपूर तालुक्याच्या नैऋत्येस सांगोला, पश्चिम व वायव्येस माळशिरस, उत्तरेस माढा, ईशान्य व पूर्वेस मोहोळ आणि आग्नेय व दक्षिणेस मंगळवेढा हे सोलापूर जिल्ह्यातील शेजारचे तालुके आहेत. पंढरपूर तालुक्याचे कमाल तपमान ४१.१ अंश व किमान तपमान ७.० अंश सेल्सीअस आहे. हवामान विषम व कोरडे आहे.

२.३.१ संतांचे माहेर "पंढरी"

महाराष्ट्रातील तसेच कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश येथील भाविकांचे श्रध्दास्थान, विठोबा-रखुमाई हे महाराष्ट्रातील फार मोठया लोकसंख्येचे आराध्य दैवत आहे. आषाढी व कार्तिकी एकादशीला कित्येक लाखांची यात्रा भरते. त्याखालोखाल माघ, चैत्री अशा यात्रा भरतात. आषाढ शुक्ल पक्षात आळंदी, देहू, सासवड, अमळनेर, पैठण अशा ठिकाणाहून पालख्या पायी

पंढरपूरात पोहचतात. हे ठिकाण भीमा नदीच्या काठी असून येथे नदीने अर्धवर्तुळाकार वळण घेतल्याने नदीस "चंद्रभागा" असे नांव आहे. सोलापूर शहरातून बस ने ७४ कि.मी. अंतरावर पंढरपूर ठिकाण आहे. मुख्य विठोबा मंदिर १४ व्या शतकात बांधले गेले. मंदिरास सहा प्रवेशव्दारे असून मुख्य प्रवेशव्दारी नामदेव पायरी आहे. गांवात पुंडलिक, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ अशा थोर संतांची तसेच गोपाळपूर, विष्णूपद अशी अनेक मंदिरे आहेत. येथे अनेक मठ, धर्मशाळा आहेत. रेल्वे व बस ची सोय आहे.

२.३.२ <u>लोकसंख्या</u>

पंढरपूर तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १३०३.६ चौ.कि.मी. असून ९३ खेडी व गांवाची, १२९१.५ चौ.कि.मी. क्षेत्र ग्रामीण भागात व १२.१ चौ. कि.मी. क्षेत्र नागरी भागात व्याप्त आहे.

१९८१ च्या शिरगणतीनुसार पंढरपूर तालुक्याची लोकसंख्या २३८ हजार होती. पैकी ७२.६९ टक्के म्हणजे १७३ हजार लोकसंख्या ग्रामीण व ६४ हजार [२६.८९ टक्के] लोकसंख्या शहरी आहे. सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर तालुका लोकसंख्येमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. दर चौ.कि.मी. मध्ये १८२ लोकसंख्या आहे. ग्रामीण लोकसंख्येची घनता १३४ व शहरी लोकसंख्येची घनता ५३३४ अशी आहे. एकूण तालुक्याच्या लोकसंख्येपैकी ५१.७७ टक्के लोकसंख्या साक्षर आहे.

तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी ३६९०० [१५.५० टक्के] शेतकरी, ३११०० [१३.०७ टक्के] शेतमजूर, ३७११ [१५.५९ टक्के] इतर व्यवसाय करणारे तर १३२८०० [५५.७० टक्के] लोकसंख्या काम न करणारी आहे.

२.३.३ <u>जमीन वापर</u>

१९८०-८१ च्या आकडेवारीनुसार पंढरपूर तालुक्यातील जमिनीचा वापर कसा [क्षेत्रफळ १०० हेक्टर मध्ये] होतो ते तक्ता क्रमांक २.१ मध्ये दिले आहे

तक्ता क्रमांक २.१

जमीन वापर

| | क्षेत्र वापर | क्षेत्र [०० हेक्टर] व % | |
|---|---|---|---|
| [१] | एकूण भौगोलिक क्षेत्र | १२९४ | [ १०० ] |
| [२] | जंगल व्याप्त क्षेत्र | १५ | [ १.१६ ] |
| [३] | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | ६५ | [ ५.०२ ] |
| [४] | लागवड न केलेली इतर जमीन [नं. ५ व्यतिरीक्त] | ६४ | [ ४.९५ ] |
| [५] | पडीत जमीन | १५८ | [१२.२१] |
| [६] | निव्वळ कसलेले क्षेत्र | ९९३ | [७६.७४] |
| [७] | एकापेक्षा अधिक वेळा लागवड केलेले क्षेत्र | ११५ | [ ८.८९] |
| [८] | लागवडी खालील एकूण क्षेत्र | ११०८ | [८५.६३] |
| [९] | लागवडी लायक क्षेत्र | ११६६ | [९०.११] |

तालुक्याचा बहुतेक भाग पठारी आहे. तालुक्याच्या मध्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे भीमा नदी वाहते. नदीच्या दोन्ही किना-यास पूराच्या गाळाने भरलेली उत्तमपैकी सकस जमीन आहे. पंढरपूर तालुक्याचा पश्चिम भाग मुख्यत: मुरमाड माळरान आहे. परंतु या भागात कालव्याचा पाणी पुरवठा असल्यामुळे या भागात भुईमूग, ऊस व कापूस ही पीके मोठ्या प्रमाणावर करतात. या तालुक्याच्या पूर्व भागात बरीचशी जमीन काळी आहे. परंतु या भागातील पिकांस पावसाखेरीज इतर पाण्याची काहींच सोय नाही.

२.३.४ सिंचन

१९८०-८१ मध्ये पंढरपूर तालुक्यात एकूण ६१३ मि.मी. पाऊस [४१ दिवस] झाला. ओलीता खालील एकूण क्षेत्र १६३०० हेक्टर आहे. पैकी

निव्वळ ओलीत क्षेत्र ११४७७ हेक्टर आहे. पृष्ठभागीय ओलीता खालील क्षेत्र ५७७८ हेक्टर व विहीर ओलीता खालील क्षेत्र ५६९९ हेक्टर इतके होते. ओलीता साठी विहिरी [४९५५ वापरातील], विजेचे पंपसेट [१२६०], डिझेल पंप सेट [६७०], यशस्वी कूपनलिका [३५८] बसविलेले होते तसेच हात पंप [३५७] या सिंचन साधनांचा वापर केला जातो.

२.३.५ पिकाखालील क्षेत्र

१९८०-८१ मधील पाहणीनुसार सर्व हंगामासाठी विविध पीका खालील क्षेत्र तक्ता क्रमांक २.२ प्रमाणे होते.

तक्ता क्रमांक २.२

पिकाचा आकृतिबंध

| | पिक | क्षेत्र [हेक्टर] |
|---|---|---|
| [१] | एकूण तृणधान्ये | ८१९०९ |
| [२] | एकूण कडधान्ये | १५३३६ |
| [३] | एकूण अन्नधान्ये | ९७२१५ |
| [४] | ऊस | ३१२८ |
| [५] | मसाल्याचे पदार्थ | २२५ |
| [६] | फळे व भाजीपाला | ६१५ |
| [७] | एकूण तंतू पीके | ११६६ |
| [८] | एकूण गळीताची धान्ये | ६९७० |
| [९] | एकूण औषधी व मादक पदार्थ | ११ |
| [१०] | धान्याची पीके | १४६५ |

२.३.६ बँकिंग

१९८५ पर्यंत तालुक्यातील १२ गांवामध्ये बँक कार्यालये असून त्याखाली १२१४१० लोकसंख्या येते. तालुक्यात नऊ वर्गीकृत बँका आहेत. १६ बँक कार्यालये आहेत. सहकारी बँकांच्या १२ शाखा आहेत.

२.३.७ बाजार विकास

१९७१ च्या जिल्हा शिरगणतीनुसार पंढरपूर तालुक्यामध्ये शेंग, कापड, धोंगडीची आयात केली जात होती. तंबाखू, कापूस गासडी, अगरबत्ती यांची निर्यात केली जाते. तर अगरबत्ती, चिरमुरे-पोहे, तपकीर याचे उत्पादन केले जाते. कृषि वस्तूबाबत "ज्वारी"च्या बाजार पेठेसाठी पंढरपूर प्रसिध्द आहे. वाखरीमध्ये कार्तिकी यात्रेचा घोडयांचा बाजार हा संपूर्ण हिंदुस्थानात मोठा व प्रसिध्द बाजार आहे. तसेच खिलारी गाई व बैलांबाबत हा भाग सुपरिचीत आहे.

२.३.८ आठवडी बाजार

१९८७-८८ वर्षाची आकडेवारी पहाता संपूर्ण तालुक्यात एकूण ९३ खेडी आहेत. बाजार भरणारी १३ खेडी आहेत तर बाजार नसणारी खेडी ८० आहेत.

तक्ता क्रमांक २.३

पंढरपूर तालुक्यातील आठवडी बाजार

| | बाजार दिवस | गावाचे नांव |
|---|---|---|
| [१] | सोमवार | करकंब, फुल चिंचोली |
| [२] | मंगळवार | पंढरपूर |
| [३] | बुधवार | रोपळे, पट.कुरोली |
| [४] | गुरुवार | खर्डी |
| [५] | शुक्रवार | तारापूर |
| [६] | शनिवार | भंडीशेगांव, तावशी, पुळूज |
| [७] | रविवार | भाळवणी, भोसे, सुस्ते |

## २.४ अभ्यासाखालील खेडेगांवाची पार्श्वभूमी :

प्रस्तुत अभ्यासासाठी आठ खेड्यातील प्रत्येकी दहा शेतक-यांचा अभ्यास केला आहे. या अभ्यास गावांची पार्श्वभूमी १९७१ च्या शिरगणती-नुसार पुढे दिलेली आहे.

### २.४.१ करकंब

या गावाचे एकूण क्षेत्र १५३९८ एकर आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. एक शासकीय दवाखाना आहे. पिण्यासाठी विहिरीचे पाणी व नळाचे पाणी उपलब्ध आहे. कच्चा रस्ता असून बस-थांबा आहे. कृषि जमिनीपैकी ११०० एकर जमीन विहिरी मार्फत सिंचन होते. तर १३३३७ एकर जमीन सिंचन रहीत आहे. मशागतीसाठी निव्वळ उपलब्ध जमीन ८३२ एकर आहे. नजीकचे पंढरपूर शहर २५ कि.मी.वर आहे. निवास असलेली घरे १३४३ आहेत. राहती कुटूंबसंख्या १४३७ आहे. एकूण लोकसंख्या ८५६८ इतकी असून सर्व खेड्यात या गावाचा आद्य क्रमांक लागतो. यामध्ये ४४९० पुरुष व ४०७७ स्त्रिया आहेत. ९२९ पुरुष व ८४ स्त्रिया शेतकरी आहेत. ५९१ पुरुष व २५९ स्त्रिया शेतमजूर आहेत. करकंब गांवातील श्रमिकांमध्ये २१७१ पुरुष व ३५७५ स्त्रिया आहेत.

### २.४.२ रोपळे

या गांवचे एकूण क्षेत्र ५३१० एकर आहे. येथे प्राथमिक शाळा व आरोग्य केंद्राची सोय आहे. विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरतात. गावी जाण्यासाठी पक्का रस्ता असून बस-थांबाही आहे. ४२० एकर जमीन विहिरी-व्दारा व २३० एकर कालव्याव्दारा जमीन भिजते तर ३३७६ एकर जमीन सिंचन रहीत आहे. मशागतीसाठी १२८४ एकर इतकी निव्वळ जमीन उपलब्ध आहे. पंढरपूर शहर १६ कि.मी. अंतरावर आहे. गांवात ५४३ घरे असून त्यात

५५४ कुटुंबे राहतात. एकूण लोकसंख्या ३१०३ असून १५८० पुरुष व १५२३ स्त्रिया आहेत. गांवात ४५८ पुरुष व १२ स्त्रिया शेतकरी आहेत. ३४३ पुरुष व १५५ स्त्रिया शेतमजूर आहेत. रोपळे गांवातील श्रमिकांमध्ये ७१० पुरुष व १३५१ स्त्रिया आहेत.

### २.४.३ मंडीशेगाव

गावाचे एकूण क्षेत्र ६३०६ एकर आहे. प्राथमिक शाळा आहे. विहिर व नळामार्फत पिण्याचे पाणी मिळते. कच्चा रस्ता असून बस-थांबा आहे. कृषि क्षेत्रातील २५० एकर जमीन विहिरीव्दारा व २५० एकर जमीन कालव्याव्दारा सिंचीत होते, तर ४९७४ एकर जमीन सिंचन रहित आहे. मशागतीसाठी निव्वळ उपलब्ध जमीन ८३१ एकर आहे. पंढरपूर शहर १६ कि.मी. अंतरावर आहे. गावात ३६९ इतकी घरे असून त्यात ४०३ कुटुंबे राहतात. गावाची लोकसंख्या २१२७ इतकी आहे. त्यामध्ये ११०९ पुरुष व १०१८ स्त्रिया आहेत. शेतकरी म्हणून लोकसंख्येतील ३५१ पुरुष व ७ स्त्रियांचा समावेश आहे. शेतमजूर म्हणून १५० पुरुष व १३९ स्त्रिया आहेत. मंडीशेगाव गांवातील श्रमिकांमध्ये ५५६ पुरुष व ८६९ स्त्रिया आहेत.

### २.४.४ भाळवणी

भाळवणी गांवाचे क्षेत्र १२३८५ एकर आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळांची तसेच दवाखाना आणि प्रसूती व बालकल्याण केंद्र या सोई आहेत. पिण्याचे पाणी विहिरीतून वापरतात. रस्ते पक्के असून बस-थांबा आहे. ४१८ एकर जमीन विहिरीव्दारा व ५२० एकर कालव्याव्दारा सिंचयुक्त आहे. १००९५ एकर जमीन सिंचनरहीत आहे. मशागतीसाठी १३३२ एकर जमीन उपलब्ध आहे. पंढरपूर शहर २२ किलो मिटर अंतरावर आहे. येथे भवानी देवीचे देऊळ आहे. भाळवणी गावामध्ये १०२७ घरे असून त्यात १०३४ कुटुंबे निवास करतात.

गावची लोकसंख्या ६३५६ झाली आहे. यामध्ये ३२८४ पुरुष व ३०७२ स्त्रिया आहेत. पैकी १२४५ पुरुष व १४८ स्त्रिया शेतकरी आहेत तर २४१ पुरुष व ११९ स्त्रिया शेतमजूर आहेत. भाळवणी गावामध्ये १४७६ पुरुष व २७९१ स्त्रिया श्रमिक वर्गातील आहेत.

२.४.५ <u>गादेगांव</u>

गांवाचे क्षेत्र ४३४८ एकर आहे. प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र, कुटूंब नियोजन केंद्राची सोय आहे. गावास विहिरीव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. गावी जाण्यासाठी कच्चा रस्ता असून बस-थांबा आहे. एकूण शेतकी जमिनीपैकी ३९५ एकर जमीन विहिरी व्दारा व २५० एकर जमिन कालव्याव्दारे ओलीताखाली आहे. मात्र ३४७९ एकर जमीन सिंचन रहीत आहे. २२४ एकर जमिन मशागतीसाठी उपलब्ध आहे. पंढरपूर शहर गावापासून ९ कि.मी. अंतरावर आहे. येथे सिध्दनाथाचे देऊळ आहे. गादेगांव येथे ६५९ घरे असून त्यात ८६९ कुटूंबे राहतात. गावाची एकूण लोकसंख्या ३८७३इतकी असून २०१६ पुरुष व १८५७ स्त्रिया आहेत. शेतकरी म्हणून ६२९ पुरुष व ५८ स्त्रिया आहेत, तर शेतमजूरांमध्ये ३४० पुरुष व २०९ स्त्रिया आहेत. गादेगांव मध्ये ८९२ पुरुष व १५८१ स्त्रिया श्रमिक आहेत.

२.४.६ <u>तुंगत</u>

तुंगत गावाचे एकूण क्षेत्र ४९१४ एकर आहे. प्राथमिक शाळा आहे. गांवास पिण्याचे पाणी विहिरीव्दारा मिळते. तुंगत गावाच्या दळणवळणासाठी पक्का रस्ता व बस-थांब्याची सोय आहे. कृषि जमिनीपैकी १८ ५ एकर जमिन विहिरीव्दारा व ३७५ एकर जमीन कालव्याव्दारा सिंचन होते. ३६९८ एकर जमीन सिंचनरहीत आहे. लागवडीसाठी निव्वळ उपलब्ध क्षेत्र ६५६ एकर आहे. तुंगत पासून पंढरपूर शहर १२ कि.मि. अंतरावर आहे. गावात महादेवाचे मंदिर आहे. गावामध्ये ३९४ घरे असून त्यातून ४०० कुटूंबे राहतात. गावाची लोकसंख्या २१८८ आहे त्यामध्ये ११०८ पुरुष व १०८० स्त्रिया आहेत. शेतकरी म्हणून

२८५ पुरुष व ६२ स्त्रियांचा समावेश आहे. शेतमजूर म्हणून १८९ पुरुष व ५३ स्त्रिया आहेत. तुंगत गावात ५७१ पुरुष व ९६२ स्त्रिया हया श्रमिक आहेत.

२.४.७ सिध्देवाडी

सिध्देवाडी गावाचे एकूण क्षेत्र २०२८ एकर आहे. येथे प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. तसेच आरोग्य केंद्राची सोय आहे. पिण्याचे पाणी विहिर व नदीव्दारे मिळते. दळणवळणासाठी रस्ता कच्चा आहे. बस-थांब्याची सोय आहे. ८० एकर जमीन विहिरीव्दारा भिजते तर १८३६ एकर जमीन सिंचन रहीत आहे. मशागतीसाठी निव्वळ उपलब्ध क्षेत्र ११२ एकर आहे. गावापासून मंगळवेढा शहर ९ कि.मि. अंतरावर आहे. गांवात १९५ घरे असून त्यात २०० कुटुंबे राहतात. गावाची लोकसंख्या ११७८ असून ६२२ पुरुष व ५५६ स्त्रिया आहेत. शेतकरी म्हणून १९६ पुरुषांचा सहभाग आहे. ५६ पुरुष व ८ स्त्रिया हे शेतमजूर आहेत. सिध्देवाडी गावातील ३०४ पुरुष व ५४५ स्त्रिया हया श्रमिकांमध्ये येतात.

२.४.८ सरकोली

सरकोली गावाचे क्षेत्र ५१७१ एकर आहे. येथे प्राथमिक शाळा आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नदीवर अवलंबून राहावे लागते. दळणवळणासाठी रस्ता कच्चा आहे. शेतकी जमिनीपैकी २२७ एकर जमीन विहिरीव्दारा भिजते. तर ४१४० एकर जमीन सिंचनरहीत आहे. मशागतीसाठी निव्वळ उपलब्ध क्षेत्र ८०४ एकर आहे. गावापासून पंढरपूर शहर २५ कि.मी. अंतरावर आहे. गावात २४८ घरे आहेत. त्यात २४७ इतके कुटुंबे राहतात. गावाची लोकसंख्या २०१८ आहे. त्यापैकी १०४७ पुरुष व ९७१ स्त्रिया आहेत. गांवात ४२२ पुरुष व ५७ स्त्रिया शेतकरी आहेत. तर १३२ पुरुष व ७२ स्त्रिया शेतमजूर आहेत. सरकोली गावामध्ये ४६१ पुरुष व ८३९ स्त्रिया हया श्रमिक म्हणून आहेत.

उपरोक्त सर्व गावांमध्ये विजेची सोय झालेली आहे. सर्व गावांत पोस्ट ऑफिस आहे. सर्व गावाचे मुख्य पीक "ज्वारी" हे आहे.

*****

## संदर्भ


1. GOVT. OF BOMBAY : 1. Legal Department- 'The Bombay Agricultural Produce Markets Act No.XXII, 1939 and Rules 1941'
   2. Agricultural Department- 'Report of the Expert Committee on the review of the Bombay Agricultural Market Act, 1939-56'.

2. GOVT. OF MAHARASHTRA : 1. Legal Department- 'The Maharashtra Acgricultural Produce Marketing (Regulation) Act, 1963', Maharashtra Act No.XX of 1964.

3. जोशी व.शं., कायमखाने, लिला कृ. : "अद्यावत महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री [नियमन] अधिनियम, १९६३ व कृषि उत्पन्न खरेदी-विक्री [नियमन] नियम १९६७", ज्ञानदीप प्रकाशन, पुणे, १९८७

4. MAMORIA C.B., JOSHI R.L. : 'Principles and Practices of Marketing in India', Kitab Mahal, Allahabad, 1978.

5. SINGH G.N., SINGH D.S., SINGH R.I. : 'Agricultural Marketing in India', Chugh Publications, Allahabad, 1987.

6. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन व जिल्हा सोलापूर, १९८५-८६ अर्थ व सांख्यिकीय संचनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

7. GOVT. OF INDIA : Census Hand-Book - Solapur District, 1971.

# प्रकरण तिसरे

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेची कार्यपध्दती आणि विकास


३.१ पूर्वस्थिती

३.२ स्थापना

३.३ मुख्य बाजारपेठेचे कार्यक्षेत्र

३.४ उपबाजार

३.५ बाजार समितीची रचना

३.६ सभापती व उपसभापती

३.७ सभा

३.८ उपसमिती

३.९ बाजार व्यवस्थापन (प्रशासकीय सेवक)

३.१० बाजार आवाराची रचना

३.११ बाजार आवारातील सुविधा

३.१२ सार्वजनिक सुविधा

३.१३ नियंत्रित केलेल्या कृषि वस्तू

३.१४ बाजार समितीचे परवानाधारक मध्यस्थ

३.१५ बाजार आकार

३.१६ व्यवसाय विश्लेषण

३.१७ सहकारी क्षेत्राचा संस्थांचा सहभाग


३.१८ शेतमालाची प्रतवारी

३.१९ कृषि उत्पन्नाचे वितरण


३.२० बाजार माहिती

३.२१ शेतमालविक्री व्यवस्था

३.२२ बाजार समितीची वित्तीय स्थिती




३.१ सोलापूर जिल्ह्याचा नकाशा




३.२ पंढरपूर तालुक्याचा नकाशा

# प्रकरण तिसरे

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेची कार्यपध्दती व विकास

### ३.१ पूर्वस्थिती :

फार पूर्वीपासून पंढरपूर शहरात आडत बाजारपध्दती अस्तित्वात होती. शहराच्या नवीपेठ विभागामध्ये बाजार भरत असे. शेतमाल दाखवून सौदे देण्याची पध्दतीही रुढ होती. लाभ, काटा, कडता तसेच जास्त कमिशन दर, सूट, सांड कापणे, माती कापणे वगैरे अयोग्य प्रथात व्यापारात राजरोसपणे चालू होते. साठवणूक सोईचा अभाव होता. व्यापारी कृषि बाजार विकसीत करण्यात व सोई-सुविधा निर्माण करण्यात निरुत्साही होते. शेतक-यांना फायदेशीर किंमत मिळत नसे. सध्याचे पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार आवार या परिस्थितीचे फल होय. तालुक्याच्या विकासाबरोबर कृषि विपणनाचाही विकास होत गेला.

### ३.२ स्थापना :

महाराष्ट्र राज्याने प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती स्थापन केली. सोलापूर जिल्ह्यातील एकूण दहा बाजार समितीपैकी कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरची स्थापना १६/६/१९४७ रोजी केली गेली. गव्हर्मेंट नोटीफिकेशन रेव्हिन्यु डिपार्टमेंट नं. ६४७५/३९, ए/बी, ता. १३/६/१९४७ नुसार पंढरपूर तालुक्यात मुंबई सरकारचा बॉम्बे ॲग्रिकल्चरल प्रोडयुस मार्केट ॲक्ट ता. १/७/१९४७ रोजी लागू केला. त्यान्वये पंढरपूर तालुक्यातील सर्व गावांना शेंगा, शेंगदाणे, करडी, तूर, हरभरा, कापूस व रुई या नियमित शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात हा कायदा लागू झाला. कायदा लागू झाल्यावर बाजार समितीचे कामकाज चालू करण्याकरीता १९४७ मध्ये सभासदांची नेमणूक सरकारकडून झाली. पहिल्या सरकार नियुक्त सभासदांची मुदत दोन वर्षे होती.

बाजार समितीचे पहिले चेअरमन पदावर श्री. बा.ब. बोरगांवकर यांची एकमताने निवड झाली. २३.१०.१९४८ रोजी पोटकायदा मंजूर झाला. ता. १.१.१९४९ पासून बाजार समितीच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात झाली. १९८६-८७ या वर्षापासून बाजार समिती "अ" वर्गात कार्य करीत आहे.

३.३ मुख्य बाजाराचे कार्यक्षेत्र :

कृषि उत्पन्न बाजाराच्या कार्यक्षेत्राखाली पंढरपूर शहर व तालुक्यातील ९३ खेडी समाविष्ट आहेत. तालुक्याची एकूण लोकसंख्या २३८ हजार [१९८१] होती.

३.४ उपबाजार :

कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर या मुख्य बाजार आवारा शिवाय करकंब, भाळवणी आणि मंडीशेगाव हे जाहिर केलेले दुय्यम बाजार आवार होत. उपबाजाराकरीता मालकीच्या जागेसाठी प्रयत्न चालू आहेत. अद्याप जागा ताब्यात मिळालेल्या नाहीत. करकंब व भाळवणी या ठिकाणी व्यवहार बंद आहेत. मंडीशेगाव येथे बाजार दिवशी [शनिवार] फक्त जनावरांची [शेळ्या-मेंढ्या] खरेदी-विक्री नियंत्रणाखाली चालू आहे.

३.५ बाजार समितीची रचना :

सध्याची बाजार समिती दि. २७.१.१९८७ रोजी निवडणूक होऊन अस्तित्वात आली आहे. त्याची रचना तक्ता क्रमांक ३.१ मध्ये दिली आहे.

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये शासनाचे दोन प्रतिनिधी आहेत. महाराष्ट्र कायदा १९६३ व उपनियम १९६८ अन्वये असलेल्या जिल्हा

परिषद व जिल्हा कृषि अधिकारी असे दोन प्रतिनिधींचा समावेश अद्याप झालेला दिसत नाही. शासन नियुक्त बाजार समितीचा कालावधी दोन वर्षे आणि लोकनियुक्त बाजार समितीचा कालावधी तीन वर्षे असतो.

तक्ता क्रमांक ३.१

पंढरपूर बाजार समितीची रचना

| | मतदारसंघातील उमेदवार | संख्या |
|---|---|---|
| [१] | शेतकरी प्रतिनिधी : | |
| | १] प्राथमिक सहकारी पतसंस्था | ७ |
| | २] ग्रामपंचायत | ३ |
| [२] | व्यापारी प्रतिनिधी | ३ |
| [३] | सभापती, तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ | १ |
| [४] | सभापती, पंचायत समिती | १ |
| [५] | स्थानिक स्वराज्य संस्था [नगरपरिषद] | १ |
| [६] | शासनाचे प्रतिनिधी | २ |
| | एकूण .... | १८ |

३.६ सभापती आणि उपसभापती :

बाजार समितीच्या संचालक मंडळाकडून सभापती व उपसभापतींची नेमणूक केली जाते. दोन्ही पदासाठी शैक्षणिक अर्हतेची गरज नसते. उभयतांच्या पदाचा कालावधी सामान्यपणे तीन वर्षे असतो. सध्याची बाजार समिती लोकनियुक्त असून तीची मुदत २६.१.९१ ला संपते.

३.७ सभा :

कामाच्या आवश्यकतेनुसार सभा घेतल्या जातात. महाराष्ट्र कायद्यान्वये दोन महिन्यात किमान एक सभेची मर्यादा आहे. १९७७ ते १९८९ पर्यंत सर्वसाधारण सभा ३३४ झाल्या असून सभेतील उपस्थिती किमान दोनतृतीअंश होती. सर्व सभा कार्यालयामध्येच होतात. तसेच उपसमित्यांच्याही सभा वेळोवेळी होत असतात.

३.८ उपसमिती :

बाजार समितीमध्ये विविध उपसमित्या अस्तित्वात आणल्या जातात. वांदा उपसमितीचे सभापती बाजार समितीचे उपसभापती असतात. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये तक्ता क्रमांक ३.२ नुसार उपसमित्या अस्तित्वात आहेत.

तक्ता क्रमांक ३.२

कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर-उपसमिती व सदस्य संख्या

| | उपसमिती | सदस्य संख्या |
|---|---|---|
| [१] | नियमन उपसमिती | ८ |
| [२] | पुतवारी उपसमिती | ७ |
| [३] | बांधकाम उपसमिती | ७ |
| [४] | वांदा उपसमिती | ६ |
| [५] | सेवक उपसमिती | ५ |
| [६] | अनुज्ञप्ती उपसमिती | ४ |

३.९ बाजार व्यवस्थापन [प्रशासकीय सेवक ]:

बाजार समिती सचिव, इतर अधिकारी आणि कर्मचा-यांची नेमणूक बाजार व्यवस्थापन पाहण्यासाठी नेमणूक करते. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार

समितीचे एकूण १४ प्रशासकीय कर्मचारी आहेत. शासनाने मान्यता दिलेल्या सेवक संख्येपेक्षा [२१] कमी कर्मचारी व्यवस्थापन पाहतात. त्यांना "अ" वर्गाची वेतन श्रेणीनुसार वेतन दिले जाते. सचिव हा मुख्य कार्यकारी [व्यवस्थापक] अधिकारी असतो. सभापतीचे उत्तरदायित्व सचिवाकडे असते. सचिव कर्मचाऱ्यांना कामे वाटून देतो. बाजार समितीच्या सभेस तो उपस्थित राहू शकतो. बाजार आवार, खातेपुस्तके, वजने व मापे यांच्यावर पर्यवेक्षण करतो. बाजार आवारात उद्भवणारे वाद तावडतोब मिटवितो. बाजार समितीचे यश बहुतेककरून सचिवाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.

३.१० <u>बाजार आवाराची रचना</u> :

मुख्य बाजार आवार शहराच्या पश्चिमेस पंढरपूर-अकलूज मार्गावर सर्व्हे नंबर ९७ व ९८ मध्ये १६ हेक्टर २१ आर क्षेत्रफळामध्ये आहे. मुख्य बाजार आवार बंदीस्त असून २५ x ८५ फुटाचे ७४ व २० x ५० फुटाचे ९ प्लॉट्स आहेत. [नकाशा पहा] पंढरपूर बाजार आवार शहरातील व्यवहाराचे मोठे ठिकाण बनले आहे.

३.११ <u>बाजार आवारातील सुविधा</u> :

पंढरपूर बाजार आवारामध्ये शेतकरी व्यापारी व सभासदांसाठी विविध सोईंची उपलब्धता आहे. आवारामध्ये १.०५ x ५१.६ फूट आकाराचे दोन सेल हॉल, २ कि.मि. लांबीचे दहा रस्ते, चौदा तोट्या असलेले पिण्याच्या पाण्याचे सात स्टँड पोस्ट आहेत. जनावरांसाठी ५ पाण्याचे हौद आणि दोन मोठे हौद आहेत. तसेच विहिरीवरून जनावरांसाठी पाणीपुरवठा केला जातो. एक शेतकरी निवास आहे. जनावरांसाठी ५० x १० फूट आकाराचे दोन शेड आहेत. दोन गेट पेक पोस्ट आहेत, ३२ संडास व मुताऱ्या आहेत. गाडीतळ तसेच प्रकाश व आरोग्याची सोयही आहे.

बाजार समितीच्या नियम क्र.२२ प्रमाणे बाजार आवारातील या सुधारणा केल्या असून त्या अपू-या असल्याने आणखी करावयाच्या आहेत.

३.१२ साठवणूक सुविधा :

बाजार आवारात आलेल्या शेतमालाचे संरक्षण करण्यासाठी गुदामे बांधण्यात आली आहेत. एक हजार मेट्रीक टन क्षमता असलेले ४५ x २५ फूट आकाराचे आकरा गोदाम व्यापा-यांच्या मालकीचे आहेत. दोन हजार मे.टन क्षमता असलेले ८० x २५ फूट आकाराचे दोन वेअर हाऊसिंगच्या मालकीची गोदामे आहेत. दोन हजार मे.टन क्षमता असलेले ८५ x ६० फूट आकाराचे मार्केटींग फेडरेशनच्या मालकीचे एक गोदाम आहे. विक्रीसाठी आलेल्या मालावर व्यापारी गोडावून भाडे वसूल करीत नाहीत. आवारामध्ये बाजार समितीच्या मालकीचे गोदाम नाही. तसेच शीत गृहाची सोय नाही.

३.१३ नियमित केलेल्या कृषि वस्तु :

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारामध्ये एकूण २८ कृषि वस्तू व सात प्रकारच्या जनावरांच्या विक्रीवर नियंत्रण आहे. यामध्ये शेंगा, शेंगदाणे, करडी, तूर, हरभरा, कापूस, रुई [१३.६.१९४७], ज्वारी, बाजरी, गहू, खपली, हुलगा मटकी, एरंडी, तीळ, मीरची [लाल], गुळ [५.१२.१९५५], गाई, बैल, म्हैस, रेडा, घोडा-घोडी, शेळ्या-मेंढ्या [२९.७.१९६०], साळी, तांदूळ, मका, कांदा, वाळ [२७.१.१९६३], वैरण [१४.८.१९६९], मूग [१३.११.१९७३], जवस, चिंच व लिंबू [६.६.१९८४] सूर्यफूल बी [२१.१.१९८५] यांचा समावेश होतो. पंढरपूर तालुक्याचे क्षेत्रात आता यापेतो नियमन केलेल्या शेतीच्या उत्पन्नाच्या जोडीला केळी, डाळींब व द्राक्षे या नियमन न केलेल्यांची खरेदी-विक्रीचे नियमन करण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

३.१४ **बाजार समितीचे परवानाधारक मध्यस्थ :**

व्यापारासाठी किंवा तत्संबंधीच्या सेवा बाजार आवारामध्ये उपलब्ध करण्यासाठी बाजार समितीचा एका वर्षासाठी परवाना घ्यावा लागतो. महाराष्ट्र कायदा १९६३ मधील सहा क्रमांकाच्या तरतुदीनुसार बाजार समिती व्यापाऱ्यांना परवाना देते व सात क्रमांकाच्या तरतुदीनुसार अशा ह परवान्याचे नूतनीकरण करते. अनुज्ञप्तीची व्यवहाराची व्याप्ती पुढील प्रकारे :-

[१] जनरल कमिशन एजंट [अडते] :- सर्व शेतमालांचा बाजार क्षेत्रात कोठेही व्यवहार करणे.

[२] "अ" वर्ग व्यापारी :- सर्व शेतमालाचा बाजार क्षेत्रात कोठेही व्यवहार करणे.

[३] "ब" वर्ग व्यापारी [तेल व डाळीवाले] :- फक्त डाळीवाले, हातचक्कीवर डाळ तयार करण्याकरीता कडधान्याचा व तेली, बैल घाण्यावर तेल तयार करण्याकरीता तेल बियाण्यांचा व्यवहार करू शकतात.

[४] "क" वर्ग व्यापारी [फडकरी] :- बाजाराचे दिवशी काटयावर खरेदी-विक्रीचा व्यवहार करणे.

[५] "ड" वर्ग व्यापारी [जनावरे] :- बाजार क्षेत्रात कोठेही गाय, बैल, म्हैस, रेडे, घोडे यांचा व्यवहार करणे.

[६] "इ" वर्ग व्यापारी [शेळी-मेंढी] :- मेंढया व बकरी यांचा बाजार क्षेत्रात कोठही व्यवहार करणे.

[७] दलाल :- बाजार क्षेत्रात कोठेही गुरेढोरे व मेंढयाबाबत दलाली करणे.

[८] प्रोसेसर [उत्पादक परवाना धारक] :- बाजार क्षेत्रातील गिरण्या, कापूस जिनिंग व वा प्रक्रीया संस्था हे व्यवहार क्षेत्र असते.

[९] सर्वेक्षक, [१०] तोलार, [११] वखारवाला, [१२] मदतनीस,

[१३] हमाल - या सर्वांचे व्यवहार क्षेत्र बाजार क्षेत्रात कोठेही.

तक्ता क्रमांक ३.३ वरून असे दिसून येते की, मागील दहा वर्षांचा विचार करता पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारामध्ये परवानगीधारक "ड" वर्ग व्यापारी, "इ" वर्ग व्यापारी, दलाल, सर्वेक्षक एकही नाही. १९७८-७९ च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये मध्यस्थांच्या संख्येत १२९ नी घट होऊन एकूण ४७५ इतके राहिले.

३.१५ विपणन आकार :

१] परवाना/अनुज्ञप्ती फी :-

बाजार समिती विविध प्रकारचे परवाने विविध व्यापारी, दलाल, हमाल, तोलारी इत्यादींना देत असते. परवाना धारकावर परवाना फी आकारली जाते. तक्ता क्रमांक ३.३ नुसार पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये परवाना फी वसूल केली जाते.

परवाना धारकाने कायद्याचा भंग केल्यास त्याचा परवाना रद्द केला जातो व त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते.

२] बाजार फी :-

महाराष्ट्र कायदा, १९६३ मधील कलम १३ मधील तरतुदीनुसार पंढरपूर बाजार समितीने बाजार फी ठरविलेली आहे. ही बाजार फी शेतमालाच्या वजनानुसार विक्रेत्यांकडून घेतली जाते. तसेच शेतमालाच्या ठरविलेल्या किंमतीच्या प्रमाणात खरेदीदारांकडूनही बाजार फी वसूल केली जाते.

## तक्ता क्रमांक ३.३

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती परवाना धारकांची संख्या

| अ.नं. | अनुज्ञप्ती प्रकार | अनुज्ञप्ती फी या वार्षिक दर रु. | नूतनीकरण फी या वार्षिक दर रु. | १९७८-७९ | १९७९-८० | ८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | ८६-८७ | ८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जनरल कमिशन एजंट | १०० | ९० | ६१ | ५६ | ६३ | ६१ | ६१ | ६६ | ६१ | ६५ | ६५ | ६५ |
| २. | १. "अ" वर्ग व्यापारी | १०० | ९० | ९९ | ९९ | ११० | १०४ | १२४ | १३३ | १२१ | ११६ | १२७ | १२९ |
| | २. "ब" वर्ग व्यापारी | ५० | ४५ | १० | १० | १० | १२ | १० | ३ | १ | १ | १ | १ |
| | ३. "क" वर्ग व्यापारी | २५ | २३ | ३१ | १९ | २७ | ३७ | १४ | २२ | २२ | २० | २४ | २२ |
| | ४. "ड" वर्ग व्यापारी | १५ | १४ | - | - | - | - | = | - | - | - | - | - |
| | ५. "इ" वर्ग व्यापारी | १० | ९ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | दलाल | १५ | १४ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४. | प्रोसेसर | १०० | ९० | १६ | १५ | १४ | १४ | १७ | २४ | २४ | २८ | २५ | २६ |
| ५. | सर्वेक्षक | १० | ९ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | तोलार | १० | ९ | १६ | १३ | १३ | ९ | १० | ९ | ९ | ७ | ८ | ८ |
| ७. | वखारवाला | १५ | १४ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| ८. | मदतनीस | ३ | २ | १८८ | १७२ | १८१ | १४५ | १७० | १६३ | १६८ | १६५ | १६१ | १५७ |
| ९. | हमाल | २ | १ | १८२ | १९८ | २०१ | १२४ | १९० | ७८ | ६८ | ६६ | ४१ | ६६ |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरचा वार्षिक अहवाल [१९७८-१९८८]

## तक्ता क्रमांक ३.५

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती–बाजार फी
[१९८७–८८]

| अ.नं. | | शेतमालाचे नांव | बाजार फी | परिमाण | दर रु. | वसूली कोणाकडून | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [१] | १. | शेंगा, शेंगदाणे, करडी, तुर, हरभरा, ज्वारी, बाजरी, गहू, अवली, हुलगा, मटकी, एरंडी, तीळ, मिरची, गुळ, कापूस, रुई, ताकी, तांदुळ, मका, कांदा, वाटाणा, मुग, वैरण, चिंच, जवस व सुर्यफूल बी | कमिशन | दर १००रु. च्या किंमतीवर | २.५० | विक्रेता | विक्री करीता माल उतरुन घेणे, सौद्यामध्ये विक्री, वजन व मीते करणे, विक्रीच्या रकमेची पट्टी करणे. |
| | २. | लिंबू | कमिशन | –"– | ६.०० | विक्रेता | –"– |
| [२] | १. | शेंगा मिरची [लाल], कापूस व रुई | हमाली | प्रत्येक पोत्यात | ०.३० | विक्रेता | वहातातून माल उतरुन थप्पी लावणे, सौद्यात दाखविणे, खरेदीदाराच्या पोत्यात माल भरुन पोती काट्यावर चढविणे |
| | २. | ज्वारी, बाजरी, गहू, अवली, शेंगदाणे, करडी, तुर, हरभरा, हुलगा, मटकी, एरंडी, तीळ, ताकी, तांदुळ, मका, कांदा, वाटाणा, मुग, जवस, चिंच, सुर्यफूल बी | हमाली | प्रति क्विंटल | ०.६० | विक्रेता | |
| | ३. | गुळ | हमाली | प्रती ढेपीत | ०.१२ | विक्रेता | |
| | ४. | लिंबू | हमाली | १० किलोत | ०.२५ | विक्रेता | |
| [३] | १. | कापूस, शेंगा, मिरची, रुई, गुळ, शेंगदाणे, करडी, तुर, हरभरा ज्वारी, बाजरी, गहू, अवली, हुलगा, मटकी, एरंडी, तीळ, ताकी, तांदुळ, मका, कांदा, वाटाणा, जवस, चिंच व सुर्यफूल बी | तोलाई | प्रति क्विंटल | ०.२५ | विक्रेता | वजन–काटा करणे, काटापट्टी करणे, आणि काटापट्टी देणे |
| | २. | लिंबू | तोलाई | १० किलोत | ०.०२ | विक्रेता | |

संदर्भ : पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक अहवाल [१९८७–८८]

पंढरपूर बाजार आवारामध्ये कमिशन, हमाली व तोलाईच्या संदर्भात विक्रेत्यांकडून बाजार फी वसूल केली जाते याबाबतची माहिती तक्ता क्र. ३.४ मध्ये दिली आहे.

३.१६ <u>व्यवसाय विश्लेषण :</u>

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेतील वस्तूंची आवक व मूल्य व किंमतीचा निवडक वस्तूंच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी १९७८-७९ मध्ये ज्या शेतमाल व पशुधनाची आवक वस्तूंच्या एकूण आवकेच्या १० टक्क्या-पेक्षा जास्त होती अशा महत्वाच्या नियमित वस्तूंचा अभ्यास येथे केला आहे. यामध्ये शेंग, ज्वारी, गुळ, कापूस, बैल व शेळया-मेंढया यांचा समावेश आहे. १९७८-७९ ते १९७८-८८ या दशकातील आवक,आवक मूल्य व सरासरी किंमत यांचा अभ्यास तक्ता क्रमांक ३.५, ३.६ व ३.७ वरून केला आहे.

३.१६.१ <u>शेंग :</u>

एकूण शेतमालामध्ये १९७८-७९ मध्ये शेंगाची आवक २१.५६टक्के होती. ती १९८७-८८ मध्ये ८.८६ टक्के झाली. १९८०-८१ पर्यंत शेंगाची आवक घटत गेली. १९८१-८२ मध्ये शेंग आवकेत गेल्या वर्षीच्या तुलनेने ९.४६ टक्क्यांनी वाढ झाली. मात्र १९८२-८३ मध्ये ४१.१३ टक्के इतकी मोठी घट झाली. यात नंतर १९८३-८४ मध्ये मात्र खूप वाढ [६१.९१ टक्के] झाली. नंतरच्या वर्षी त्यात पुन्हा गत वर्षीच्या शेंगेच्या आवकेच्या तुलनेत घट [१७.६५ टक्के] झाली. मात्र १९८५-८६ मध्ये शेंग आवकेत १९.८७ टक्क्यांनी वाढ झाली. १९८६-८७ व १९८७-८८ या दोन वर्षात शेंग आवकेत घट होत गेली. एकंदरीत दशकातील आवकेत प्रतीवर्षी घट व वाढ अशाक्रमाने सतत बदल झालेला दिसतो. १९७८-७९ या वर्षाचा विचार करता १९८७-८८ मध्ये शेंग

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेंगा | ४८,३५९ [२१.५६] | ३०,८६७ [१४.९३] | २८,५१३ [१६.८८] | ३१,३१० [१९.५८] | १८,३७२ [१३.०८] | २९,७४८ [१५.६९] | २४,४९७ [१०.३६] | २९,३६५ [९.८३] | १९७६० [८.६०] | १७,५८८ [८.८६] |
| २. | शेंगदाणे | २,८६३ [१.२८] | २,४७९ [१.३०] | १,९९० [१.१८] | २,४३४ [१.५३] | २,५३८ [१.८१] | २,५६१ [१.३५] | ५,५५८ [२.३५] | ४,५५२ [१.५२] | ३,१०२ [१.३५] | २,१७८ [१.१०] |
| ३. | करडी | ६,१५२ [२.७४] | ३.२१६ [१.५६] | २,४८१ [१.४७] | २,५९७ [२.३६] | १,५१९ [१.०८] | ९६८ [०.५१] | २,१९३ [०.९३] | २,३७० [०.७९] | ३,४६७ [१.५१] | १,५५८ [०.७८] |
| ४. | तूर | २,४३४ [१.०९] | १,४४६ [०.७१] | १,७९० [१.०६] | २,७३१ [१.७१] | ३,४०३ [२.४२] | १,५२७ [०.८१] | १,४२५ [०.६०] | १,३०२ [०.४४] | १,१०७ [०.४८] | २,००७ [१.०१] |
| ५. | हरभरा | ५,७८३ [२.५८] | ७,१७० [३.४७] | ५,२२५ [३.१०] | ६९३५ [५.३५] | ३,२८१ [२.३४] | ३,२९९ [१.७४] | २०,४३५ [५.६८] | १०,८७७ [३.६४] | ६,१८३ [२.६९] | ३,२०५ [१.६१] |
| ६. | ज्वारी | ३२,७३५ [१४.६०] | ४०,१४६ [१९.४२] | ३३,६८७ [१४.०२] | ३१८९४ [२०.०१] | ४१,७१७ [२९.६९] | ५०,९६० [२६.८८] | ७५,५३९ [३१.९४] | १०३,१९७ [३४.२०] | ५८,२४९ [२५.३३] | ८१,३४३ [४१ ] |
| ७. | बाजरी | २,३०४ [१.०१] | ३६० [०.१७] | ६८५ [०.४१] | १,६५४ [१.०४] | ३७८ [०.२७] | ५१६ [०.२७] | १,९९९ [०.८३] | १,१८१ [०.४०] | २,४८७ [१.१०] | ३,१४० [१.५८] |
| ८. | गहू | ९,०८८ [४.०५] | १०,००८ [४.८४] | ६३२५ [३.७४] | ८,४६३ [५.३१] | ०९,२८२ [६.६१] | ११,६७० [६.१४] | ११,४५९ [४.८४] | १४,८४२ [५ ] | २०,००० [८.७०] | १५४७२ [७.८०] |
| ९. | कापली | १२,६५५ [६.०९] | १२,२९८ [५.९५] | ६,४५३ [३.८२] | ५,६८२ [३.५७] | ६,२४० [४.४४] | ६,६३९ [३.५०] | ८,२४९ [३.५२] | ६,७२८ [२.२५] | ५,९०२ [२.५७] | ४,३१८ [२.१७] |
| १०. | हुलगा | १,१६८ [०.५२] | ६५ [०.०३] | ११२ [०.०७] | ५८० [०.३६] | ४१ [०.०३] | ४१५ [०.२२] | २८५ [०.१२] | २२२ [०.०७] | १२५ [०.०६] | ५०० [०.२५] |
| ११. | मटकी | १,०९८ [०.४९] | २०८ [०.१०] | २२६ [०.१४] | ३२२ [०.२०] | ६२७ [०.४५] | ८२८ [०.४७] | ७०८ [०.३०] | ७२९ [०.२५] | ६१० [०.२७] | ८१२ [०.४१] |
| १२. | एरंडी | १,२०५ [०.५४] | ८९२ [०.३८] | ६५० [०.३८] | ६४८ [०.४१] | ७१० [०.५१] | २९६ [०.१६] | ५९९ [०.२५] | २४८ [०.०८] | ७७३ [०.३४] | ४५१ [०.२२] |
| १३. | तीळ | २४६ [०.११ ] | २८ [०.०१] | ३६ [०.०२] | २८१ [०.१८] | ३२ [०.०२] | ४८ [०.०३] | ७१ [०.०२] | ८६ [०.०३] | १५९ [०.०७] | ८९ [०.०४] |
| १४. | लाल मिरची | ४३१ [०.१९] | ४०२ [०.१९] | १७३ [०.१०] | २६५ [०.१७] | ३३१ [०.२३] | २२९ [०.१२] | ५१७ [०.२२] | २९० [०.१०] | ७६९ [०.३३] | १९१ [०.१०] |
| १५. | गुळ | १५,२२५ [६.७९] | ३३,७७१ [१६.३३] | ४२,३३१ [२५.०६] | २६,२३० [१६.५२] | १६,३७९ [११.६६] | १८,८२७ [९.९३] | १७,७५८ [७.५१] | २०,२०८ [६.७६] | ९,५७८ [४.१७] | ८,२९४ [४.१८] |
| १६. | कापूस | २६,४४७ [११.७९] | ११,६८६ [५.६५] | ८,४०६ [४.९८] | २,००१ [१.२६] | - | - | ४,१६० [१.७६] | ६,०२४ [२.०२] | १,००२ [०.४४] | ८६ [०.०४] |
| ७. | ताळी | ९,१२७ [४.०७] | ३,४०६ [१.७०] | १,२८७ [०.७६] | ४,१२२ [२.५९] | ४,०१९ [२.८६] | ९,००९ [४.७४] | ९,२४२ [२.९५] | १०,८६५ [३.६४] | ९,४९५ [४.१३] | ८,५०५ [४.२८] |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | ५,६३४ | ५,७८५ | ५,४४७ | १०,४४८ | ८,११९ | १५,७२९ | २१,००० | २४,८६८ | २२,०६३ | १६,२५४ |
| | [ ३.५१] | [ ३.८०] | [ ३.२२] | [ ६.५६] | [ ५.८३] | [ ८.३०] | [ ८.८८] | [ ६.७२] | [ ९.६०] | [ ८.१८] |
| मका | ७,६९९ | ७,६८० | ७,६०१ | ६,१८३ | ५,१५८ | ८,१८४ | १६,३३५ | २२,९८३ | १५,०६६ | ११,०५९ |
| | [ ३.४३] | [ ३.७१] | [ ४.५०] | [ २.८८] | [ २.६४] | [ ४.३२] | [ ६.९१] | [ ७.७०] | [ ६.५५] | [ ५.५७] |

पु.पा.चालू....



तक्ता क्रमांक ३.५

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेतील विविध कृषि वस्तूंची वार्षिक आवक [ शेतमाल क्विंटल मध्ये व पशूधन नग संख्येत ]

| अ.नं. | कृषि वस्तुंचे नांव | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०. | कांदा | ३१,०९७ [१३.८७] | ३३,३४६ [१६.१३] | ३३,८०५ [१४.०९] | १३,१४२ [८.३७] | १८,०६४ [१२.८६] | २७,९०४ [१४.७२] | १६,४०५ [६.९८] | २८,५५१ [८.८९] | ३४,३३१ [१४.९३] | १४,५३० [७.३२] |
| २१. | वाल | १,४९३ [०.६७] | १,२०३ [०.५८] | १,३४२ [०.६०] | — | ८२ [०.०६] | — | ३,१५० [१.३३] | — | — | — |
| २२. | मूग | ५९ [०.०३] | १७४ [०.०८] | ३५० [०.२०] | ४०७ [०.२६] | १४४ [०.१०] | १५४ [०.०८] | २०१ [०.०८] | २६५ [०.०९] | ३८५ [०.१७] | ३३७ [०.१६] |
| २३. | जवस | — | — | — | — | — | — | २ [०] | ९ [०] | ४ [०] | ११ [०] |
| २४. | चिंच | — | — | — | — | — | — | — | — | २ [०] | २ [०] |
| २५. | लिंबू | — | — | — | — | — | — | १,४७० [०.६२] | १०,७७८ [३.६१] | १२,८४२ [५.५९] | १,२२१ [०.६१] |
| २६. | सूर्यफूल [बी] | — | — | — | — | — | — | — | १,२६५ [०.४२] | २,४४५ [१.०६] | ५,४४७ [२.७४] |
| | एकूण | २,२४,२८१ [१००] | २,०६,७७७ [१००] | १,६८,९१७ [१००] | १,५९,३५८ [१००] | १,४०,४९९ [१००] | १,८९,५६० [१००] | २,३६,५२७ [१००] | २,९८,८१० [१००] | २,२९,९१७ [१००] | १,९८,५८९ [१००] |
| २७. | गाय | ५७२ [१०.१४] | ७७५ [१४.८४] | ४३१ [७] | ५१२ [११] | ४५६ [८] | ६२२ [५.१०] | ५३८ [५.३५] | ३६२ [३.७८] | ३७९ [३.५८] | ६३४ [५.६५] |
| २८. | बैल | ३,०१२ [५३.४०] | २,३४९ [४६.८०] | ४,०५८ [६५.६६] | २,३४५ [४८.११] | ३,४५९ [६०.२०] | २,९७५ [२४.३४] | २,९१९ [२९.०३] | २,८०७ [२९.३४] | ३,२०५ [३०.२८] | ३,९५१ [३५.२१] |
| २९. | म्हैस | ३२० [५.६७] | ३४६ [६.९०] | २७४ [४.४३] | २५१ [५.३८] | २४६ [४.२७] | ४५२ [३.७१] | ३३३ [३.३१] | ३६९ [३.८६] | ४१४ [३.९१] | ५६५ [५.०४] |
| ३०. | रेडा | ११३ [२] | ९० [१.८०] | १२१ [२] | १५५ [३.३२] | ११९ [२.२४] | १२८ [१.०५] | ८९ [०.८९] | ९५ [१] | ८७ [०.८२] | १२२ [१.१०] |
| ३१. | घोडा-घोडी | ४०८ [७.२३] | ३७६ [७.५०] | २४६ [४] | ३६४ [७.८०] | ३७५ [६.५९] | ३८६ [३.१६] | ३१५ [३.१३] | ४६८ [४.९०] | ३५७ [३.३७] | ३८७ [३.४५] |
| ३२. | शेळ्या-मेंढ्या | १,२१६ [२१.५६] | १,११२ [२२.१८] | १,०५० [५०] | १,१३८ [२४.३९] | १,०९८ [१९.०५] | ७,६६० [६२.६६] | ५,८६० [५८.२९] | ५,४६६ [५७.१२] | ६,१४१ [५८.०२] | ५,५६० [४९.५५] |
| | एकूण .... | ५,६४० [१००] | ५,०१९ [१००] | ६,१८० [१००] | ४,६६६ [१००] | ५,७६२ [१००] | १२,२२५ [१००] | १०,०५४ [१००] | ९,५६७ [१००] | १०,५८२ [१००] | ११,२२० [१००] |
| ३३. | वैरण | ६,४१६ | ६,९२८ | ९,९४५ | १०,२२६ | ९,७५० | १२,७८८ | ११,००० | १२,६०७ | १०,३०२ | ९,८३० |

संदर्भ : पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७८-७९ ते १९८७-८८

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेंगा | १,०२,११२ [२६.६१] | ७८,२०९ [२०.२२] | ९८,०९५ [२३.२६] | १,१५,२५० [३२.३७] | ७२,४७५ [२५.५८] | १,३३,४३१ [२१.१०] | १,१०,४८२ [१९.५७] | १,३६,७२७ [१९.८४] | १,३२,५५७ [२१.४७] | १,३५,५६३ [२१.५४] |
| २. | शेंगदाणे | ९,३१६ [०२.४३] | ११,१७७ [०२.९०] | ११,३७२ [०२.७०] | १२,२२५ [०३.७१] | १४,८५२ [०५.२४] | १६,०५० [०३.७७] | ४०,४०७ [०७.१४] | ३३,६२४ [०४.७३] | ३३,०५० [०५.१९] | २४,५७७ [०३.८९] |
| ३. | करडी | १२,६७५ [०३.३०] | ९,४४७ [०२.४५] | १०,५३८ [०२.५०] | १,१७५ [००.३३] | ५,२९७ [०१.८७] | ३,६८१ [००.८६] | ८,१८९ [०१.४५] | ९,३६६ [०१.३६] | १५,१११ [०२.४५] | ७,४८२ [०१.१८] |
| ४. | तूर | ५,९६२ [०१.५५] | ३,२५२ [००.८४] | ४,९२२ [०१.१७] | ८,२२२ [०२.३१] | ४,४०१ [०१.५५] | ५,८१२ [०१.३६] | ४,१९१ [००.७४] | ४,५०२ [००.६६] | ४,३०४ [००.७०] | १०,८८७ [०१.७२] |
| ५. | हरभरा | १३,४९० [०३.५२] | १६,९६८ [०४.४१] | १८,९६० [०४.५०] | १६,४८७ [०४.१९] | ७,७९७ [०२.७५] | १०,९२७ [०२.५७] | ४३,३०५ [०७.६५] | ३८,४९६ [०५.६०] | १९,४४९ [०३.१५] | १४,६३७ [०२.३२] |
| ६. | ज्वारी | ३९,६०१ [१०.३३] | ५१,१३१ [१३.२८] | ३८,३९७ [०९.१०] | ४८,९६७ [१३.७५] | ६२,४८५ [२२.०६] | ८०,०५२ [१८.८०] | १,०७,९२२ [१०.०७] | १,४०,०७४ [२०.३३] | ९९,५५५ [१६.१२] | १,२४,२८४ [२१.२४] |
| ७. | बाजरी | २,११६ [००.५५] | ४०३ [००.१०] | ९०४ [००.२१] | ९,०७९ [००.५८] | ५१२ [००.१८] | ७६१ [००.८१] | २,८९६ [००.५१] | २,०६४ [००.३०] | ४,१४६ [००.६४] | ५,२८४ [००.८४] |
| ८. | गहू | १३,३६९ [०३.४८] | १५,४९६ [०४.०६] | १२,६५६ [०३.००] | २४,२४९ [०६.८१] | २१,००६ [०७.४४] | २३,६२२ [०५.५५] | ४३,६५२ [०७.४१] | ३५,४४४ [०५.१४] | ४२,५३० [०६.८९] | ३९,०८२ [०६.१८] |
| ९. | साळी | १५,८९४ [०४.१४] | १५,७०३ [०४.०८] | ११,०२४ [०२.६१] | ९,८२१ [०२.७६] | १२,६०७ [०४.४५] | १२,४५२ [०२.९२] | १४,४७१ [०२.४६] | १८,२८९ [०२.६५] | २४,४७३ [०३.९६] | २८,१९८ [०४.४६] |
| १०. | हुलगा | ९०१ [००.२३] | ५९ [००.०१] | १६० [००.०४] | ७५७ [००.१६] | ४८ [००.०१] | ६४३ [००.१५] | ४०२ [००.०८] | ४३८ [००.०६] | १८५ [००.०३] | ८६४ [००.१४] |
| ११. | मटकी | २,४३१ [००.६३] | ६०९ [००.१६] | ८७६ [००.२१] | १,९२८ [००.५४] | १,८७७ [००.६६] | २,७३६ [००.६४] | २,४८२ [००.४४] | ३,१७६ [००.४६] | २,७६९ [००.४५] | ४,५१७ [००.७१] |
| १२. | एरंडी | २,००१ [००.५२] | २,१५८ [००.५६] | १,५९९ [००.३७] | १,७७१ [००.४४] | २,१६२ [००.७६] | १,२२४ [००.२९] | १,७७० [००.३१] | ६९८ [००.१०] | २,४२५ [००.३९] | १,८६१ [००.२९] |
| १३. | तीळ | ७९६ [००.२१] | १०३ [००.२३] | २०२ [००.०५] | १,२८९ [००.३६] | २१४ [००.०६] | २५४ [००.०८] | ५२२ [००.०९] | ४८१ [००.०७] | १,५९६ [००.२६] | ९०० [००.१४] |
| १४. | लाल मिरची | १,९२८ [००.५०] | २१,४८ [००.५६] | १,२८१ [००.३०] | २,११२ [००.६२] | १,७०२ [००.६०] | १,५८८ [००.३७] | ६,६८२ [०१.२९] | २९४६ [००.४२] | ४,३३८ [००.७०] | २,७४१ [००.४३] |
| १५. | गूळ | २१,१४८ [०५.५१] | ८०,७६८ [२०.९८] | १,१९,६९२ [२८.२८] | ४६,७७२ [१३.१४] | २८,९२१ [१०.२१] | ४५,१६१ [१०.८४] | ४२,४९९ [०७.६२] | ५४,६२१ [०७.७३] | ३६,२१७ [०५.८७] | २९,७२५ [०४.७०] |
| १६. | कापूस | १,००,५५१ [२६.२०] | ४४,६९९ [११.६१] | ५३,५०७ [१२.६९] | १०,०५९ [०२.८३] | — [ — ] | — [ — ] | १९,७६८ [०३.४९] | २८,३३४ [०४.१०] | ४६३१ [००.७५] | ४६८ [००.०७] |
| १७. | लाकी | ९,८१६ [०२.५६] | ५,३९९ [०१.४०] | ५,१५५ [०१.२२] | ९,७६० [०२.७४] | ९,३३९ [०३.३०] | ३१,२८९ [०५.००] | १८,८१५ [०३.२२] | २६,३०४ [०३.८२] | २३,७८९ [०३.८५] | १५,६९० [०२.४८] |
| १८. | तांदूळ | ९,०२७ | १३,८७२ | १०,५०८ | २०,५५० | २०,१८२ | ३८,७५८ | ५५,०५६ | ६६,८३९ | [illegible] | [illegible] |

तक्ता क्रमांक ३.६

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितिमधील कृषि मालाच्या वार्षिक आवक मूल्य

["००" रुपयात]

| अ.नं. | कृषि वस्तुचे नांव | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९. | मका | [०२.३५]<br>७,०८३<br>[०१.८५] | [०३.६०]<br>९,१३४<br>[०२.३७] | [०२.४९]<br>१०,५९५<br>[०२.५१] | [५.७७]<br>८,६९७<br>[०२.४४] | [०७.१२]<br>८,४२२<br>[०२.९७] | [६.७५]<br>१२,०३४<br>[०२.८३] | [०९.७३]<br>२४,८२७<br>[०४.३९] | [०९.७०]<br>४६,४९३<br>[०६.७५] | [०९.३२]<br>३३,५०२<br>[०५.४३] | [०७.२३]<br>४४,११५<br>[०६.९८] |

पृ.पा. चालू...

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | डोंगा | २१० | २५३ | ३४३ | ३६८ | ३९४ | ४४५ | ४५२ | ४६५ | ६७१ | ७७० |
| २. | डोंगदाणे | ३२६ | ४५१ | ५७१ | ५४३ | ५८५ | ६२७ | ७२५ | ७१६ | १,०३३ | १,१२८ |
| ३. | करडी | २०६ | २९४ | ४२५ | ३२७ | ३४९ | ३८० | ३७३ | ३९५ | ४३६ | ४८० |
| ४. | तूर | २४५ | २२० | २४५ | २१३ | १२९ | ३८१ | २९६ | ३५१ | ३८९ | ५४३ |
| ५. | हरभरा | २३३ | २३७ | ३६३ | २६६ | २३८ | ३३१ | ३२२ | ३५५ | ३१५ | ४५७ |
| ६. | ज्वारी | १२० | १२७ | १६२ | १५३ | १४९ | १५७ | १४३ | १३६ | १७० | १९४ |
| ७. | बाजरी | ९३ | ११२ | १३२ | १२३ | १३५ | १४८ | १४७ | १७५ | १६७ | १६८ |
| ८. | गहू | १४७ | १५५ | २०० | २८६ | २२७ | २०३ | ३८१ | २३९ | २१३ | २५१ |
| ९. | अळशी | ११६ | १२८ | १४१ | १७३ | २०२ | १८८ | १७३ | २७३ | ४१५ | ६२९ |
| १०. | हुलगा | ७७ | ९१ | १४२ | १३१ | ११७ | १५५ | १६६ | १९६ | १३७ | १७३ |
| ११. | मटकी | २२१ | २९३ | ३७१ | ५९७ | २९९ | ३०५ | ३५१ | ४३० | ४५४ | ५५६ |
| १२. | घेवडी | १६६ | २४२ | १४१ | २४२ | ३०५ | ४१४ | २९६ | २८१ | ३१५ | ४१३ |
| १३. | तीळ | ३२४ | ३६८ | ५६१ | ४५९ | ६६९ | ७३३ | ७४९ | ५५९ | १,००४ | १,१४० |
| १४. | लाल मिरची | ४४७ | ५३३ | ७४० | ८२७ | ५३० | ६९३ | १,२९२ | १,०१६ | ५६४ | १,४३५ |
| १५. | गूळ | १२९ | २३९ | २८३ | १७७ | १७६ | २४५ | २४० | २७० | ३७८ | ३५८ |
| १६. | कापूस | ३८० | ३८२ | ५१७ | ५०३ | उपलब्ध नाही | | ४७५ | ४६९ | ४६१ | ५४४ |
| १७. | लाखी | १०७ | १५४ | ४०० | २३७ | २३२ | २३६ | २०१ | २४२ | २५१ | ३४१ |
| १८. | तांदूळ | १६० | २४० | १९३ | १९७ | २४६ | २३६ | २६२ | २६९ | २६१ | २८१ |
| १९. | मका | ९२ | ११९ | १३९ | १४१ | १६३ | २४७ | १५२ | २०२ | २२२ | ३९९ |
| २०. | कांदा | ३४ | ६३ | ३२ | ८० | ४८ | ५३ | ४६ | ५२ | ७६ | ९२ |
| २१. | वाल | १८९ | २२७ | १९४ | - | २४६ | उ.ना. | २०५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २२. | मूग | २६४ | २८८ | ३२२ | २९४ | ३०० | ३१७ | २८७ | ३५७ | ३६२ | ४०४ |
| २३. | जवस | - | - | - | - | - | - | २५० | ४३३ | ९१८ | ८४७ |
| २४. | चिंच | - | - | - | - | - | - | - | - | ४९२ | ३०० |
| २५. | लिंबू | - | - | - | - | - | - | १७४ | १८६ | २११ | २७७ |
| २६. | सूर्यफूल (बी) | - | - | - | - | - | - | - | ५०१ | ८७६ | ६७७ |
| २७. | गाय | ४०० | ५४७ | ४३२ | ४०३ | ५९३ | ५५० | ७३८ | १,३०८ | २,१६९ | १,२०० |
| २८. | बैल | ९८० | १,१४० | ७९९ | १,५९५ | १,१२५ | १,१४९ | १,१५४ | १,१९९ | १,१४४ | १,२०६ |
| २९. | म्हैस | २,५५० | १,१४० | १,४२२ | १,३८७ | १,६७७ | २,०९९ | १,८९४ | ,२२२७ | २,१४९ | २,११८ |
| ३०. | रेडा | ३८७ | ३७१ | ३५५ | ४५७ | ४५० | ४३१ | ५९१ | ४६१ | ४९४ | ५०१ |
| ३१. | घोडा-घोडी | ७८३ | ७२४ | ७१८ | १,०८३ | १,२१४ | १,३४७ | १,४४१ | १,१८१ | १,८९१ | १,८१७ |
| ३२. | शेळ्या-मेंढ्या | १२२ | १३१ | १३७ | १४५ | १४१ | ११४ | १२७ | १४४ | १३१ | १५२ |
| ३३. | वैरण | ५६ | ६८ | ८१ | ७४ | १०४ | १०१ | ११९ | १३९ | १५७ | १५५ |

संदर्भ : तक्ता क्रमांक ३.५ व ३.६ वरून.



तक्ता क्रमांक ३.७

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत झालेल्या कृषि मालाची सरासरी किंमत

[ रुपये ]

| अ. नं. | कृषि वस्तुचे नांव | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

आवकेत ३६.६३ टक्क्यांनी घट झाली. मात्र संपूर्ण दशकांचा विचार करता शेंग आवकेची घट ५.५० टक्के होती असे सामान्यपणे म्हणता येईल.

सकल शेतमाल आवकमूल्याचा विचार करता शेंगाचे आवकमूल्य प्रमाण १९८४-८५ व १९८५-८६ या दोन वर्षात खूप घटलेले आहे. निव्वळ शेंगाचे आवकमूल्य विचारात घेता १९८२-८३ मध्ये घटीचे प्रमाणे ३७.११ असे मोठे होते. त्याच्या पुढील वर्षी लागलीच १९८३-८४ मध्ये ८२.७३ टक्क्यानी मोठे आवकमूल्य प्राप्त झाले. १९७८-७९ च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये एकूण आवक मूल्य दरवर्षी सरासरीने ३२.७९ टक्क्यांनी वाढले. संपूर्ण दशकाचा विचार करता शेंग आवकमूल्यात ७.१४ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

शेंगाची सर्वसाधारण किंमत [प्रती क्विंटल] १९७८-७९ मध्ये २१७/- रुपये होती ती १९८७-८८ मध्ये ७७०/- रुपये एवढी झाली. म्हणजे किंमतीत २६६.६७ टक्क्यांनी वाढ झाली. शेंगाची किंमत प्रतीवर्षी कमी-जास्त प्रमाणात वाढतच गेली. संपूर्ण दशकाचा विचार करता शेंगाची प्रती क्विंटल सर्वसाधारण किंमतीत दरसाल सरासरीने १४.६९ टक्क्यांनी वाढ झाली असे दिसते.

## ३.१६.२ ज्वारी :

१९८६-८७ यावर्षा पेक्षा १९८०-८१ मध्ये ज्वारीच्या आवकेत ४१.०१ टक्क्यांनी घट झाली. हि दोन्ही वर्षे अपवाद म्हणून वगळता ज्वारीची आवक सर्व वर्षी समाधानकारकपणे वाढलेली दिसते. एकूण शेतमाल आवकेपैकी १९७८-७९ मध्ये १४.६० टक्के आवक ज्वारीची होती त्याचे प्रमाण १९८७-८८ मध्ये ४१ टक्के झाले म्हणजे ज्वारीची आवक १४८.४९ टक्क्यांनी वाढली. ही वाढ लक्षात राहण्यासारखी आहे.

KOLHAPUR

संपूर्ण दशकाचा एकत्रित विचार करता ज्वारीच्या एकूण आवकेत दरवर्षी सरासरीने १५.८४ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

ज्वारी आवक मूल्याचा विचार करता आगोदरच्या वर्षाच्या मानाने १९८०-८१ मध्ये [२६.८६ टक्के] व १९८६-८७ मध्ये [२८.९३ टक्के] घट झालेली दिसते. तर इतर सर्व वर्षी आवक मूल्य वाढत गेलेले आहे. १९७८-७९ मध्ये पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेत आलेल्या एकूण ज्वारीचे मूल्य सर्व शेतमालाच्या आवकमूल्यापैकी १०.३३ टक्के होते ते १९८७-८८ मध्ये २३९.०९ टक्क्यांनी वाढून एकूण शेतमाल मूल्याच्या २१.२४ टक्के झाले. १९८७-८८ मध्ये ज्वारीचे आवक मूल्य गेल्यावर्षीच्या संदर्भात ३४.८८ टक्क्यानी वाढले. ही वाढ सर्वात जास्त आहे. सकल वर्षाचा विचार करता ज्वारीचे आवक मूल्य सरासरीने १५.६१ टक्क्यानी वाढलेले दिसते.

ज्वारीची सरासरी किंमत १९७८-७९ मध्ये १२०/- रुपये प्रती क्विंटल होती ती १९८७-८८ मध्ये १६४/- रुपये झाली म्हणजे १९७८-७९ पेक्षा १९८७-८८ मध्ये ज्वारीचीकिंमत ३६.६७ टक्क्यांनी वाढलेली दिसते. १९८१ ते ८३, १९८४ ते ८६, व १९८७-८८ या पाच वर्षी अनुक्रमे ५.५६, २.६१, ८.९२, ४.९० व ३.५३ टक्क्यांनी ज्वारीची किंमत घटली. तर १९८०-८१ मध्ये २७.५६ टक्के, १९८६-८७ मध्ये २५ टक्के अशी ठळक किंमत वाढ दिसते. सर्व वर्षांचा विचार करतो ज्वारीच्या किंमत वाढीचा दरसाल सरासरी दर ३.८२ टक्के होता असे दिसून येते.

३.१६.३ <u>गुळ</u> :

एकूण शेतमाल आवकेत गुळाची आवक १९७९-८० ते १९८२-८३ पर्यंत चांगली [१० टक्केच्यावर] होती. १९७९-८० मध्ये गुळाची आवक

अगोदरच्या वर्षाच्या संदर्भात १२१.८१ टक्क्यांनी वाढली. १९८६-८७ मध्ये गुळाची आवक १९८५-८६ च्या तुलनेत ५२.६० टक्क्यांनी घटली. साधारणपणे गुळ आवक प्रतीवर्षी घट व वाढ या स्वरुपात दिसते. एकूण शेतमालामध्ये १९७८-७९ मध्ये गुळाची आवक ६.७९ टक्के होती तीत १९८७-८८ मध्ये ४२.५२ टक्क्यांनी घट होऊन एकूण शेतमाल आवकेच्या ४.१ टक्के झालेली दिसते. संपूर्ण दशकाचा विचार करता गुळाची आवक दरसाल सरासरीने २.८६ टक्क्यांनी वाढलेली आहे.

एकूण शेतमालाच्या मूल्याचा विचार करता १९७९-८० ते १९८३-८४ पर्यंत गुळाचे आवकमूल्य सामान्यपणे १० ते २० टक्के दिसते. एकूण शेतमाल आवक मूल्यात १९७८-७९ मध्ये ५.५१ टक्के आवकमूल्य गुळाचे होते ते १९८७-८८ मध्ये ४.७० टक्के झाले, मात्र या दोन आवक मूल्यात ४०.५६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. १९८०-८१ च्या संदर्भात १९८१-८२ मध्ये गुळाचे आवकमूल्य ६०.९२ टक्क्यांनी घटले आहे. संपूर्ण दशकाचा विचार करता गुळाच्या आवकमूल्य वाढीचा दरवर्षी सरासरी दर २५.९५ टक्के होता असे दिसते.

गुळाची सर्वसाधारण प्रती क्विंटल किंमत १९७८-७९ मध्ये १२९/-रुपये होती. ती १९८७-८८ मध्ये ३५८/-रुपये प्रती क्विंटल झाली. म्हणजे या दोन वर्षाचा सापेक्षतेने विचार केल्यास गुळाच्या दरात १५७.५५ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. १९८१-८२,१९८२-८३, १९८४-८५, १९८७-८८ या चारही वर्षी गुळाची किंमत मागील वर्षाचा विचार करता घटलेली दिसते. असे असले तरी १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकाचा एकत्रित विचार करता गुळाची किंमत दरसाल सरासरीने १३.६७ टक्क्यांनी वाढलेली दिसते.

३.१६.४ कापूस :

१९७८-७९ ते १९८७-८८ या दशकाचा विचार करता कापसाची आवक ९१.४३ टक्क्यांनी घटलेली स्पष्ट दिसते. १९८४-८५ व १९८५-८६ या

दोन वर्षात कापसाच्या आवकेत क्रमशः १०७.९० व ४४.८१ टक्क्यांनी वाढ झाली. हा अपवाद वगळता १९७८-७९ पासून कापूस आवक घटतच गेलेली दिसते. एकूण शेतमालामध्ये १९७८-७९ मध्ये कापसाची आवक ११.७९ टक्के होती ती १९८७-८८ मध्ये ०.०४ टक्के इतकी आवक झाली. १९७८-७९ मधील कापसाची आवकही दशकातील सर्वात मोठी आवक होती.

अभ्यास दशक कालावधीत १९८२ ते ८४ व १९८६ ते ८८ या काळात पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार आवारामध्ये कापूस एकाधिकार खरेदीचे कार्य राज्य स्तरावर महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन या संस्थेमार्फत पार पडले. १९८२ ते ८४ यावर्षी एकाधिकार खरेदी पध्दतीने संपूर्ण कापूस शासनाने खरेदी केल्याने त्याबाबत आकडेवारी उपलब्ध नाही. १९८६ ते ८८ या काळात लेव्ही वसूली पध्दतीने शासनाने कापूस खरेदी केला त्यामुळे सदर वर्षी काही प्रमाणात शिल्लक कापसाचा लिलाव झाला त्याबाबतच आकडेवारी उपलब्ध आहे. १९८६-८७ व १९८७-८८ या दोन वर्षात लेव्ही वसूली शिवाय शिल्लक कापूस एकूण कृषि मालाच्या आवकेच्या क्रमशः ०.४४ व ०.०४ टक्के होती.

ज्याप्रमाणे आवक घटली त्याप्रमाणे कापसाचे आवक मूल्य देखील घटले आहे. सर्व शेतमालाचा विचार करता १९७८-७९ मध्ये कापसाचे आवकमूल्य २६.२० टक्के होते ते १९८७-८८ मध्ये ०.०७ टक्के इतकेच आवकमूल्य कापसास प्राप्त झाले. मागील वर्षाच्या संदर्भात १९८०-८१ मध्ये १९.७१ टक्क्यांनी, १९८४-८५ मध्ये ९७.५२ टक्क्यांनी व १९८५-८६ मध्ये ४२.८३ टक्क्यांनी कापसाचे आवकमूल्य वाढले हा अपवाद वगळता प्रतीवर्षी आवकमूल्य घटत गेलेले दिसते. संपूर्ण दशकाचा विचार करता कापूस आवकमूल्य घटीचा दर प्रतीवर्षी सरासरीने १८.७७ इतका होता ही खेदाची बाब होय. १९८७-८८ मध्ये आगोदरच्या वर्षाच्या संदर्भात सर्वात जास्त म्हणजे ८९.८७ टक्क्यांनी घट झाली.

कापसाच्या सरासरी किंमतीचा विचार करता संपूर्ण दशकात किंमत वाढीचा दर प्रतीवर्षी सरासरीने ५.३३ टक्के होता. १९८१-८२ पासून १९८६-८७ पर्यंत कापसाची प्रती क्विंटल किंमत घटत गेलेली दिसते. १९८०-८१ व १९८१-८२ मध्ये कापसास अनुक्रमे ५१७ रुपये व ५०३ रुपये प्रती क्विंटल असा चांगला दर मिळाला.

३.१६.५ कांदा :

१९७८-७९ ते १९८७-८८ या दशकामध्ये कांद्याची आवक दरवर्षी सरासरीने १.७ अशी अत्यल्प दराने वाढलेली दिसते. १९८५-८६ मध्ये १९८४-८५ च्या संदर्भात कांद्याची आवक ६०.८७ टक्क्यांनी वाढली. तर त्याच्यानंतरच्या वर्षी [१९८६-८७ मध्ये] कांद्याची आवक आणखी २९.३० टक्क्यांनी वाढली मात्र १९८७-८८ मध्ये कांद्याची आवक १९८६-८७ च्या तुलनेत ५७.६८ टक्क्यांनी घटलेली दिसते.तीही घट मोठी होती. १९८६-८७ मध्ये एकूण शेतमाल आवकेच्या १४.९३ टक्के अशी कांद्याची चांगली आवक झाली.

संपूर्ण दशकाचा विचार करता कांद्याचे आवकमूल्य वाढीचा दर दरवर्षी सरासरीने २०.५८ टक्के दिसतो. १९८०-८१ [६३.५३ टक्के], १९८२-८३ [२१.४५ टक्के], १९८४-८५ [४८.९० टक्के], १९८७-८८ [४९.०५ टक्के] कांद्याचे आवकमूल्य घटलेले आहे. कांदा आवकमूल्यातील आगोदरच्या वर्षाच्या संदर्भातील वाढ १९७९-८० मध्ये ९९.६८ टक्के तर १९८६-८७ मध्ये ९०.९३ टक्क्याची स्पष्ट दिसते.

१९७८-७९ ते १९८७-८८ या दशकात प्रतीवर्षी सरासरीने कांद्याची प्रती क्विंटलचा दर २२.५८ टक्क्यांनी वाढलेला आहे. १९८०-८१ [४९.२१ टक्के], १९८२-८३ [४३.५टक्के] १९८४-८५ [१३.२१ टक्के], यावर्षी त्याच्या आगोदरच्या वर्षाच्या किंमतीच्या तुलनेत कांद्याची सर्वसाधारण

किंमत घटलेली आहे. इतर सर्व वर्षी कांद्याचे भाव वाढत गेले. १९७८-७९ मध्ये कांद्याचा भाव ३४ रुपये क्विंटल होता तर तो १९८७-८८ मध्ये ९३रुपये क्विंटल असा झालेला दिसतो.


कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरमधील वरील शेतमालांच्या अभ्यासावरून असे दिसते की, बाजार आवारात १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकात प्रतीवर्षी सरासरीने ज्वारी [१५.८४ टक्के], शेंग [५.५० टक्के], गुळ [२.८६ टक्के], कांदा [१.७] टक्के यांची आवक वाढली. मात्र कापसाची आवक ९.२८ टक्क्यांनी घटलेली दिसते. याप्रमाणेच गुळ [२५.९५ टक्के], कांदा [२०.५८ टक्के], ज्वारी [१५.६१ टक्के], शेंग [७.१४ टक्के], या शेतमालाचे एकूण मूल्य वाढले आहे. तर कापसाचे एकूण मूल्य [१८.७७ टक्क्यांनी] घटले आहे. दशकात शेतमालाच्या किंमतीचा विचार करता कांदा [२२.५८ टक्के], शेंग [१४.६९ टक्के], गुळ [१३.६७ टक्के], कापूस [५.३३ टक्के], ज्वारी [३.८२ टक्के] या शेतमालांची प्रती क्विंटल किंमत वाढलेल्या दिसतात.

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व शेतमालाचा विचार करता ज्वारीची आवक सर्वात जास्त आहे. यावरून असे म्हणता येईल की, पंढरपूर बाजार आवार मुख्यत्वे "ज्वारी" ची बाजारपेठ आहे.

कृषि उत्पन्न बाजार समितीतील एकूण शेतमालाच्या आवकेचा मागील दहा वर्षांचा विचार करता आवकप्रमाण कमी होत चाललेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे साखर कारखाने होत. शेतक-यांचा कल ऊस पिकविण्याकडे फार झुकला असून तो पिकविलेला ऊस साखर कारखा-याला घालण्याची प्रवृत्ती वाढत आहे. अन्यथा गुळाची आवक वाढत गेलेली दिसली असती. श्रीपूर [बोरगाव], माळीनगर [अकलूज], शंकरनगर[अकलूज],

३.४ निवडक नियमित शेतमाल आवकेचे तौलनिक स्तंभालेख

[प्रमाण १ इंच = ५००० क्विं.]



सदाशिवनगर [पुरंदावडे], कुमठे, वेणूनगर [गुरसाळे], तुळशीदास [इर्ले], महाडिकनगर [टाकळी-सिकंदर] अशा सोलापूर जिल्ह्यातील तसेच प्रवरानगर, राहूरी, अहमदनगर, फलटण या भागातील साखर कारखान्यांना पंढरपूर तालुक्यातील ऊस पुरवठा होतो. त्यामुळे अशा साखर कारखान्यांच्या स्थापनेचा कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरवर प्रतिकूल परीणाम झालेला दिसून येतो.

पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या आषाढ, कार्तिक, माघ व चैत्री यात्रा भरतात पैकी माघ मासातील यात्रेमध्ये जनावरांचे प्रदर्शन व बक्षिस वितरण होत असतात. कार्तिक यात्रेतील घोडा-घोडींचा बाजार प्रसिध्द आहे. तसेच येथील खिलारी बैल प्रसिध्द आहेत. मागील दशकात एकुण जनावर आवकेमध्ये बैल व शेळ्या-मेंढयांची आवक १० टक्के पेक्षा जास्त असल्याने त्याचा अभ्यास येथे केला आहे.

३.१६.६ बै ल :

संपूर्ण दशकाचा विचार करता बैलांची आवक प्रतिवर्षी सरासरीने ७.७९ टक्क्यांनी वाढलेली दिसते. बाजार आवारात विक्री-साठी १९७८-७९ मध्ये एकूण पशुधन आवकेपैकी ५३.४० टक्के आवक बैलाची झाली होती. ती १९८७-८८ मध्ये ही आवक ३५.२१ टक्के झाली. १९८०-८१ मध्ये १९७९-८० च्या तुलनेत बैलाच्या आवकेत ७२.७५ टक्के एवढी मोठी वाढ झाली. त्यानंतर १९८२-८३ मध्ये [५४.०८ टक्के], १९८६-८७ मध्ये [१४.१८ टक्के] १९८७-८८ [२३.२८ टक्के] या वर्षी अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत बैलाची आवक वाढलेली दिसते. तर इतर वर्षी बैलांच्या आवकेत घट दिसते. १९८१-८२ मध्ये बैलांच्या आवकेत आगोदरच्या वर्षाच्या तुलनेत ४४.६८ टक्के इतकी मोठी घट दिसते.


१९७९-८० [९.३० टक्के], १९८३-८४ मध्ये[१२.२२ टक्के] १९८४-८५ मध्ये [१.३९ टक्के], १९८५-८६ मध्ये [०.१४ टक्के] या चार वर्षी बैलाचे एकूण मूल्य अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत घटले आहे. तर इतर वर्षी बैलाचे एकूण मूल्य वाढत गेले आहे. १९८७-८८ मध्ये बैलाचे आवक मूल्य १०.०५ टक्क्यांनी वाढलेले दिसते. संपूर्ण दशकाचा विचार करता बैलांच्या आवक मूल्य वाढीचा दर ५.६२ टक्के दिसून येतो.

१९८०-८१, १९८२-८३, १९८६-८७ ही तीन वर्षे सोडता प्रतिवर्षी बैलांची किंमत वाढत गेलेली आहे. १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकात बैलाचे भाव ६.३९ टक्क्यांनी वाढलेले आहेत. १९८१-८२ यावर्षी १९८०-८१ च्या तुलनेत बैलाचे भाव ९९.६२ टक्क्यांनी वाढले. १९७८-७९ मध्ये एका बैलाची किंमत ९८० रुपये होती ती १९८७-८८ मध्ये १२०६ रुपये इतकी झाली.

३.१६.७ शेळ्यामेंढ्या :

शेळ्यामेंढ्यांची आवक संपूर्ण दशकात दरसाल १८.१० टक्के असा मोठ्या दराने वाढत गेली. १९८२-८३ च्या आवकेच्या मानाने १९८३-८४ मध्ये शेळ्यामेंढ्यांच्या आवकेत प्रचंड वाढ [५१९.६३ टक्के] झाली. १९८१-८२ [८.३२ टक्के], १९८६-८७ [१२.३५ टक्के] या दोनवर्षी अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत शेळ्यामेंढ्यांची आवक वाढली. इतर वर्षी आवकेत घट झालेली दिसते. एकूण पशुधन आवकेत १९७८-७९ मध्ये २१.५६ टक्के आवक शेळ्या-मेंढ्यांची होती ती १९८७-८८ मध्ये ५८.०३ टक्के इतकी झाली.

१९७९-८० [२.२८ टक्के], १९८०-८१ [१.७१ टक्के], १९८२-८३ [६.४० टक्के], १९८४-८५ [१५.४१ टक्के] यावर्षी शेळ्यामेंढ्यांचे आवक मूल्य घटले असले तरी इतर सर्व वर्षी शेळ्यामेंढ्यांचे आवकमूल्य वाढलेले दिसते.




३·५ बैल व शेळ्यामेंढ्यांच्या आवकेचे तौलनिक स्तंभालेख

१९८३-८४ मध्ये शेळ्यामेंढ्याचे आवकमूल्य मोठ्याप्रमाणात [४६६.०४टक्के] वाढले होते. संपूर्ण दशकाचा विचार करता शेळ्यामेंढ्याचे आवक मूल्य ४८.५५ टक्के होते.

शेळ्या-मेंढ्यांची सर्वसाधारण किंमत १९७८-७९ ते १९८७-८८मध्ये अल्प दराने म्हणजे २.६८ टक्क्यांनी वाढलेली आहे. १९८३-८४ मध्ये १९.१५ टक्क्याने शेळ्यामेंढ्यांची किंमत घटली होती. १९७८-७९ मध्ये शेळ्यामेंढ्यांची किंमत १२३ रुपये होती ती १९८७-८८ मध्ये १५२ रुपये इतकी झाली.

एकंदरीत शेळ्यामेंढ्या व बैल यांच्या आवकेत, आवक मूल्यात व किंमतीत १९७८-७९ ते १९८७-८८ मध्ये वाढ होत गेलेली दिसते.

### ३.१७ सहकारी विपणन संस्थांचा सहभाग :

बाजार आवारामध्ये शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्री आडत्या, खरेदीदार व सहकारी संस्थांमार्फत होत असते. त्यासाठी उभयतांना बाजार समितीचा परवाना घ्यावा लागतो. पंढरपूर बाजार आवारामध्ये खालील परवानाधारक सहकारी संस्था अभ्यास दशकात कार्यरत होत्या.

1] पंढरपूर तालुका खरेदी-विक्री संघ, पंढरपूर.
2] दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटींग फेडरेशन लि., मुंबई [कॉटन ग्रोअर्स].
3] करकंब विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटी क्र.२ .
4] श्री तुकाराम ग्राहक सह. सोसायटी लि.
5] पंढरपूर सहकारी ग्राहक भांडार लि., पंढरपूर
6] दि गादेगांव बृहत वि.का.से.सह. सोसा. लि.,

तक्ता क्रमांक ३.८ वरून असे दिसते की मागील दशकात एकूण आवकेतील काही टक्के शेतमालाची विक्री सहकारी संस्थांमार्फत झाली आहे.

तक्ता क्रमांक ३.८

पंढरपूर बाजार आवारातील सहकारी विपणन संस्थामार्फत विक्री

| वर्ष | एकूण शेतमाल आवकेशी टक्केवारी |
|---|---|
| १९७८-७९ | ४.०६ |
| १९७९-८० | ८.२१ |
| १९८०-८१ | ५.९६ |
| १९८१-८२ | १.४१ |
| १९८२-८३ | ०.०९ |
| १९८३-८४ | ०.०७ |
| १९८४-८५ | ३.५० |
| १९८५-८६ | २.२८ |
| १९८६-८७ | ७. ९ |
| १९८७-८८ | ०.३० |

संदर्भ : बाजार समितीचे वार्षिक अहवाल.

३.१८ शेतमालाची प्रतवारी :

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेंग, करडी, तूर, हरभरा, ज्वारी यांची दर्जा, रंग, वजन या आधारावर प्रतवारी करून त्यास क्रमांक देण्यात येतो. असे शेंग १,२,३,४,५. करडी व तूरला १ ते २ नंबर व ज्वारी व हरभरा यांना १ ते ४ नंबर देऊन विभागणी केली जाते. ग्रेडरकडून नमुना तपासणी करून प्रत ठरविली जाते.

## ३.१९ कृषि उत्पन्नाचे वितरण :

पंढरपूर बाजार आवारातील ज्वारीस मुख्यत्वे सातारा, कोल्हापूर आणि कोकण भागातून मागणी येते. तसेच शेंगासाठीची मागणी सांगली, पुणे भागातून येते. लिंबाची निर्यात मुंबई, धुळे, जळगांव, खामगाव या भागाकडे केली जाते. कृषि उत्पन्नाचे वितरण मालट्रकने केले जाते. पूर्वी खपली व तीळाची आवक जास्त होती तेव्हा बँगलोर, मद्रास भागाकडे हा शेतमाल रेल्वेने पाठविला जात होता.

## ३.२० बाजार माहिती :

बाजार समितीचा नियम क्रमांक २७ अन्वये मुख्य बाजार आवारातील शेतमालाचे दर इतर ठिकाणी प्रसारीत करणे व किरकोळ बाजारभाव प्रसारीत करणे याबाबत नियमावली केलेल्या आहेत. मुंबईचे दैनिक व्यवहार भाव नोंदवहीत नोंदविले जातात. दररोजचे स्थानिक बाजारभावाबाबतची म्हणजे आवक, वितरण, दर्जा, कृषि वस्तूचे दर इ. बाबतची माहिती दैनिक केसरी, दैनिक सकाळ, दैनिक संचार या वृत्तपत्रातून प्रसिध्द केली जाते.

## ३.२१ शेतमाल विक्री व्यवस्था :

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार दैनिक असून तेथे ११ ते ५ या वेळेत खुला लिलाव होतो. शेतमालाची आवक झाल्यानंतर आडते वा खरेदीदार माल धान्यास पोच देतात. आडते आवक नोंद रजिस्टर ठेवतात. आडते वा खरेदीदार त्यांचे दुकानातील दैनिक एकूण आवकेचे आकडे लिहितात. विक्री होण्यापूर्वी प्रतवारी केली जाते. लिलावाच्या वेळी खरेदीदार सरासरीने ७५ [खातेदार] उपस्थित होतात. शेतमालाची विक्री बाजार आवारातील आडत्यांचे दुकानी व सेल हॉल मध्ये होते. लिलावाची सुरुवात ५० पैसे बोलीने होते. जास्त बोली बोलणाऱ्यास शेतमाल विक्री केला जातो. मुख्य बाजार

आवारात सरासरी ८०० क्विंटलचा लिलाव होतो. बाजार समितीचे सेवक लिलावाच्या वेळी उपस्थित असतात व त्यांच्या देखरेखीखाली लिलाव होतात. लिलावात उपस्थित असलेले सेवक सौदे रजिस्टरमध्ये विक्रीचे प्रत्येक कलमाची नोंद करतात. सौदा पट्टी लगेच दिली जाते व त्यावर खरेदीदारांच्या सह्या घेतल्या जातात. आडते विक्री रजिस्टर मध्ये नोंदी ठेवतात. नियमित शेत-मालाचे वजनमाप अधिकृत मापाड्यामार्फत केले जाते. काटापट्टीच्या प्रती मालधनी व खरेदीदार यांना दिल्या जातात. माल विक्रीची किंमत माल-धन्यास वेळेवर दिली जाते. याबाबत बाजार समितीने पहाणी व्यवस्था केली आहे.

भुसार माल व गुळाचा लिलाव दररोज होतो. लिंबाचा लिलाव शनिवार व मंगळवारी होतो. कांदा लिलाव मंगळवारी व आवश्यक असल्यास शनिवारी होतो. लाल मिरचीचा लिलाव आवकेप्रमाणे दररोज होतो.

शक्यतो शेतमालाच्या आवकेच्या दिवशीच विक्री होते. जर शेतमाल मालकाने किंमतीची मर्यादा सांगितल्यास दोन-चार दिवसाचा अवधी लागतो.

३.२२ <u>बाजार समितीची वित्तीय स्थिती :</u>

प्रस्तुत विभागामध्ये १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकातील वित्तीय बाबींचा अभ्यास केला आहे.

३.२२.१ <u>उत्पन्न मार्ग :</u>

१) <u>बाजार फी</u> - बाजारामधील व्यवहारावर खरेदीदार व विक्रेत्यांकडून बाजार समिती बाजार फी वसूल करते.

२] अनुज्ञप्ती फी - बाजार आवारातील परवानाधारक मध्यस्थांकडून परवाना फी तसेच परवाना नूतनीकरण फी वसूल केली जाते.

३] उत्पन्नाचे इतर मार्ग - दुकान, गाळे, इमारत यांचे भाडे, गोदाम जागाभाडे, छापील फॉर्म, गवत, रोपणमाती लिलाव, गेटपास फी, पर्यविक्षण फी, विनापरवाना व्यवहार करणाऱ्या मध्यस्थांना दंड, तसेच राज्यशासनामार्फत अनुदान व कर्ज इ. मार्गांनी उत्पन्न प्राप्त होते.

३.२२.२ खर्च मार्ग :

१] आस्थापना खर्च - प्रशासकीय विभागातील व्यवस्थापकीय सर्व खर्चाचा समावेश होतो.

२] खर्चाचे इतर मार्ग - इमारत, रस्ते व इतर विकासात्मक कार्यासाठी खर्च, उपबाजार विकास कार्यासाठी खर्च, कार्यालयीन साधानसामग्री खरेदी, वीज व पाणीपट्टी, जाहिरात, बँक कमिशन व इतर विविध स्वरूपाच्या खर्चाचा समावेश होतो.

तक्ता क्रमांक ३.१ वरून कृषी उत्पन्न बाजार समितीचा १९८२-८३ या वर्षा खेरीज सर्व वर्षी बाजार समितीचा खर्च उत्पन्नापेक्षा कमी राहून काही रक्कम शिल्लक राहिलेली आहे. बाजार समितीचे उत्पन्न अधिक्य १९८०-८१ मध्ये २,८४,९७२ रुपये व त्या खालोखाल १९८६-८७ मध्ये २,८२,९२७ रुपये असे होते. कारण या दोन वर्षामध्ये इतर मार्गामधून जास्त उत्पन्न [क्रमश: ५४.७४ टक्के व ३६.७१ टक्के] आणि इतर मार्गावर कमी खर्च [क्रमश: २३.१ टक्के व २७.७८ टक्के] झाला. १९८२-८३ मध्ये मात्र बाजार समितीचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त होऊन ३,५१६ रुपये इतकी तूट आली ही तूट जास्त व्यवस्थापन

## तक्ता क्रमांक ३.९


## कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरची वित्तीय स्थिती

[रुपयांत]

| वर्षे | उत्पन्न | | | | | व्यय | | | | कायम निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजार फी | अनुज्ञप्ती फी | इतर | एकूण | वाढावा | अस्थापना | इतर | एकूण | तूट | |
| १९७८-७९ | १,२१,५६६ [५८.४३] | १८,५३० [८.९१] | ५७,९५६ [२७.८६] | २,०८,०५२ [१००] | ०,५९,३६७ | १,००,०९५ [६८] | ४७,५८७ [३२] | १,४८,६८५ [१००] | नाही | ६,४२,१०१ |
| १९७९-८० | १,१९,५२० [६५.९२] | १७,३६१ [९.५८] | ४४,४२० [२४.५] | १,८१,३०२ [१००] | २९,५५५ | ८८,३७२ [५८.२४] | ६३,३०५ [४१.७६] | १,५१,७४७ [१००] | नाही | ६,७७,८५५ |
| १९८०-८१ | २,१४,१६४ [४१.३८] | २०,००५ [३.८७] | २,८३,२९० [५४.७४] | ५,१७,५०६ [१००] | २,८४,९७२ | १,७६,९७६ [७६.१] | ५५,५५७ [२३.९] | २,३२,५३४ [१००] | नाही | ९,५६,६२७ |
| १९८१-८२ | २,१३,७६८ [७०.३९] | २२,३९३ [७.३७] | ६७,५१० [२२.२३] | ३,०३,६७२ [१००] | १९,००५ | २,१६,८३० [७६.१७] | ६७,८३५ [२३.८३] | २,८४,६६६ [१००] | नाही | ९,७५,६३३ |
| १९८२-८३ | १,७९,५४३ [७८.३८] | २२,१७३ [९.६८] | २७,३५३ [११.९४] | २,२९,०७० [१००] | नाही | १,७४,८३८ [७५.१७] | ५७,७४८ [२४.८३] | २,३२,५८६ [१००] | ३,५१६ | ९,२८,३६७ |
| १९८३-८४ | २,५५,३३५ [८१.३८] | २४,७१७ [७.८८] | ३३,६९७ [१०.७४] | ३,१३,७५० [१००] | १९,६६१ - | २,१५,०९७ [७३.१४] | ७८,९९२ [२६.८६] | २,९४,०८९ [१००] | नाही | ९,४८,०२८ |
| १९८४-८५ | ३,२२,६७३ [८४.७३] | २१,२१३ [५.५७] | ३६,९४९ [९.७०] | ३,८०,८३५ [१००] | १,०६,३७२ | १,९४,२१३ [७०.७६] | ८०,२४९ [२९.२४] | २,७४,४६२ [१००] | नाही | १०,५४,४०१ |
| १९८५-८६ | ४,१३,८२१ [८८.०७] | २०,२०२ [४.३] | ३५,८४५ [७.६३] | ४,६९,८६८ [१००] | १,५७,८९२ | २,२६,१२० [७२.४८] | ८५,८५५ [२७.५२] | ३,११,९७६ [१००] | नाही | १२,१२,२६३ |
| १९८६-८७ | ४,९०,७२९ [६०.४३] | ३३,२३१ [३.८६] | २,९८,१०० [३६.७१] | ८,१२,०६० [१००] | २,८२,९२७ | ३,८२,१२९ [७२.२२] | १,४७,००४ [२७.७८] | ५,२९,१३३ [१००] | नाही | १४,९५,१८९ |
| १९८७-८८ | ५,६८,३७० [८५.१८] | २१,८६३ [३.२८] | ७७,०२२ [११.५४] | ६,६७,२५६ [१००] | ३,३८,७७० | ३,११,९०४ [७२.८] | १,१६,५८२ [२७.२] | ४,२८,४८६ [१००] | नाही | १७,३३,९६० |

संदर्भ : पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचा वार्षिक अहवाल

## ३.६ पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्न व खर्चाचा तौलनिक स्तंभालेख



खर्चामुळे [७५.१७ टक्के] दिसून येते. या तूटीच्या वर्षी दुष्काळामुळे बाजारात आवक कमी प्रमाणात आली होती.

१९७८-७९ ते १९८७-८८ या दशकात बाजार समितीच्या उत्पन्नात २२०.७२ टक्क्यांनी तर खर्चात १८८.१८ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. तक्त्यावरून बाजार फी ही महत्वाचा उत्पन्न मार्ग [जवळ-जवळ ७१ टक्के उत्पन्न मिळते] दिसतो कारण १९७८-७९ मध्ये ५८.४३ टक्के तर १९८७-८८ मध्ये ८५.१८ टक्के उत्पन्न बाजार फी मार्फत मिळाले. याशिवाय परवानगी फीच्या मार्गाने १९८२-८३ मध्ये ९.६८ टक्के कमाल व १९८६-८७ मध्ये २.८६ टक्के किमान उत्पन्न मिळाले. १९७८-७९ च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये परवाना फी च्या मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नात १७.९९ टक्क्यांनी वाढ झाली. सामान्यपणे अनुज्ञप्ती फी व्दारा बाजार समितीस ५ टक्के उत्पन्न मिळते. उत्पन्नाच्या इतर मार्गातून बाजार समितीस मिळणाऱ्या उत्पन्नात १९८७-८८ मध्ये १९७८-७९ च्या संदर्भात ३२.९० टक्क्यांनी वाढ झाली. १९७८-७९ मध्ये या मार्गातून एकूण उत्पन्नाच्या ८.९१ टक्के उत्पन्न मिळत होते. ते १९८७-८८ मध्ये एकूण उत्पन्नाच्या ३.२८ टक्के झाले या मार्गाने मिळणारे उत्पन्न सामान्यपणे घटत गेले. १९८६-८७ वर्षामध्ये शासनाच्या अनुदानामुळे एकूण उत्पन्न सर्वात जास्त म्हणजे ८,१२,३६० रुपये मिळाले होते.

खर्च बाबींचा विचार करता आस्थापनेवरील खर्च एकूण खर्चाच्या १९७८-७९ मध्ये ६८ टक्के व १९८७-८८ मध्ये ७२ टक्के झाला. सदर दशकात या खर्चामध्ये २११.६१ टक्क्यांनी वाढ झाली. इतर खर्चामध्ये देखील १४४.९९ टक्क्यांनी वाढ झाली. १९७८-७९ मध्ये इतर खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण ३२ टक्के इतके होते ते १९८७-८८ मध्ये ४१.७६ टक्के इतके झालेले दिसते.

यावरून असे म्हणता येते की, पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये उत्पन्नामध्ये बाजार फी आणि खर्चामध्ये व्यवस्थापन खर्च याबाबी महत्वाच्या होत.

३.२२.३ कायम निधी :

बाजार समिती प्रतीवर्षी कायम निधी ठेवते. कायम निधीची रक्कम बाजार समितीच्या भांडवल निधीत स्थानांतर केली जाते. तक्ता क्रमांक ३.९ वरून असे दिसते की, १९७८-७९ मध्ये कायम निधी ६,४२,१०० रुपये इतका होता. १९८७-८८ मध्ये त्यात २७० टक्क्यांनी वाढ होऊन तो १७,३३,९५९ रुपये इतका झाला. कायम निधीतील वाढ ११.१५ टक्क्याची आहे.

३.२२.४ कर्जे व अनुदान :

पंढरपूरच्या कृषि उत्पन्न बाजार समितीने गेल्या दशकात कर्जे घेतली नाहीत. १९८६-८७ मध्ये समितीस विकास कार्यासाठी राज्य शासना मार्फत २,५०,००० रुपये अनुदान प्राप्त झाले.

*****